पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

पुन्हा एकदा मोदी सरकार

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 9 । 1 मे, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



गरिबांची सेवा



वारसा आणि विकास



मध्यम वर्गाची काळजी



वंचितांसाठी प्राधान्य



श्रम शक्तीला सहाय्य



उत्पादनाचे जागतिक केंद्र



शेतकऱ्याचा सन्मान



सुशासनाने भारत समृद्ध



स्त्री शक्तीचा सन्मान



तरुणांना रोजगाराच्या संधी



## भाजपाचा संकल्प

# मोदींची गॅरंटी



## अध्यक्षीय मनोगत

# मोदींची गॅरंटी


लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये 'मोदींची गॅरंटी' हा परवलीचा शब्द बनला आहे. भारताला विकसित देश करण्याची गॅरंटी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. त्याची सर्वत्र चर्चा सुरू आहे. भारताला विकसित देश करायचे म्हणजे काय करायचे, याचा आराखडा भारतीय जनता पार्टीच्या लोकसभा निवडणुकीच्या संकल्प पत्रात दिला आहे. युवा, महिला, किसान आणि गरीब यांच्यासह सर्व समाजघटकांना सोबत घेऊन एक संपन्न आणि प्रगत देश आपल्याला मोदीजींच्या नेतृत्वात घडवायचा आहे. २०१४ साली भारताची अर्थव्यवस्था जगात अकराव्या स्थानावर होती. त्यावेळी देशाची अर्थव्यवस्था कमकुवत पाच अर्थव्यवस्थांमध्ये गणली जात होती. मोदीजींच्या नेतृत्वात गेल्या दहा वर्षात भारताची अर्थव्यवस्था भक्कम झाली असून ती फ्रान्स व इंग्लंड अशा देशांना मागे टाकून पाचव्या स्थानावर पोहोचली आहे. आगामी पाच वर्षात भारताची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या स्थानावर नेण्याचा निर्धार मोदीजींनी केला आहे. भाजपाच्या संकल्प पत्रातील अनेक आश्वासने ही आधी गेल्या दहा वर्षात त्या त्या विषयात केलेल्या भरघोस कामगिरीच्या आधारावर दिली आहेत. जम्मू काश्मीरला स्वतंत्र स्थान देणारे घटनेचे कलम ३७० रद्द करण्याचे आश्वासन भाजपाच्या नेतृत्वाखालील मोदीजींच्या सरकारने पूर्ण केले आहे. या कलमामुळे काश्मीरमध्ये देशाचे संविधान लागू पूर्णपणे लागू होत नव्हते आणि तेथील दलित, आदिवासी आणि मागासांना संविधानाने दिलेले अधिकार मिळत नव्हते हे ध्यानात घेतले पाहिजे. कलम ३७० रद्द केल्यामुळे आता संपूर्ण देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले देशाचे संविधान लागू झाले आहे. यामुळेच आम्ही संविधानाचा सन्मान राखतो, असे भाजपा म्हणतो त्यावेळी त्याला अधिक महत्त्व येते. अयोध्या येथे श्रीराम जन्मस्थानी भव्य मंदिर असावे यासाठी गेली पाचशे वर्षे समाजाचा लढा सुरू होता. मोदीजींच्या नेतृत्वात २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्या येथे श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला आणि पाचशे वर्षांचे स्वप्न साकारले. मोदी सरकारने तिहेरी तलाक रद्द करून मुस्लिम महिलांच्या डोक्यावरील टांगती तलवार दूर केली आहे. देशात उत्तम महामार्ग आणि रस्ते विकास करण्याच्या बाबतीत तर मोदी सरकारची कामगिरी ऐतिहासिक आहे. रेल्वे मार्गांची उभारणी, दुहेरीकरण आणि विद्युतीकरण याबाबतीतही मोदी सरकारने भरघोस कामगिरी केली आहे. ऐंशी कोटी लोकांना मोफत धान्य देण्यापासून घरोघर नळाने पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, गॅस कनेक्शन अशा अनेक कल्याणकारी योजना मोदी सरकारने यशस्वीपणे राबविल्या आहेत. अर्थात मोदी सरकारने आधी यशस्वी कामगिरी करून नंतर आगामी काळासाठी आश्वासन दिले आहे. परिणामी मोदीजींची गॅरंटी म्हणजे गॅरंटी पूर्ण होण्याचीही गॅरंटी असे लोकांना वाटते. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी मोदीजींच्या महाराष्ट्रात झालेल्या सभांना भर उन्हातही खूप मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहिले आणि त्यांना मोदीजींचा जयजयकार केला. मोदीजींच्या अफाट लोकप्रियतेचा असा अनुभव या निवडणुकीत सर्वत्र येत आहे. मोदींजी दरररोज सभातून विरोधकांनी उघड पाडण्यासाठी नरेटिव्ह देत आहेत. हेच मुद्दे आपण सामान्य मतदारांपर्यंत नेले पाहिजेत. विकसित भारत घडविण्याच्या महान स्वप्नासाठी आपण सर्वजण मोदीजींच्या नेतृत्वात काम करत आहोत. विजय आपलाच आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे**


# अंतरंग




०४ काँग्रेसची संपत्ती फेरवाटपाची कल्पना विकास विरोधी


१० काँग्रेसचे संपत्तीच्या फेरवाटपाचे घातक आश्वासन


१२ संविधानाचा खरा मारेकरी काँग्रेसच






१४ भाजपाचे संकल्पपत्र ही देशाच्या समृद्धीची गॅरंटी!





१८ नव्या भारताची दखल जगाला घ्यावीच लागते





२६ गोरगरिबांची संपत्ती लुबाडण्याचा काँग्रेसचा कट






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# काँग्रेसची संपत्ती फेरवाटपाची



'द टाइम्स ऑफ इंडिया'चे दिवाकर, अखिलेश सिंह आणि सिद्धार्थ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घेतलेल्या मुलाखतीचा संक्षिप्त अंश.

**प्रश्न–** तुम्ही भाजपसाठी ३७० आणि एनडीएसाठी ४०० जागांचे लक्ष्य ठेवले आहे, यामागे काय विचार आहे? पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि मतदारांमध्येही एक शैथिल्य निर्माण होऊ शकते, ते टाळण्यासाठी तुम्ही तसे केले का? तुम्ही तुमच्या मतदारांसाठीही जणू हे एक लक्ष्य ठेवले आहे. पण एवढ्या आत्मविश्वासाने दिलेला 'अब की बार चारसौ पार'चा नारा आणि भाजपसाठी ३७० जागांचे लक्ष्य यामुळे तुमच्या कार्यकर्त्यांमध्ये शैथिल्य येऊ शकते. त्यामुळे पक्षाचे नुकसान होईल, असा विचार कधी केला आहे का?

**पंतप्रधान :** पक्षाच्या घोषणांमधून लोकांच्या भावना दिसून येतात. हा नागरिकांचा सामूहिक आवाज आहे. सर्वसामान्य माणूस आमचे प्रयत्न जाणतो आणि आणखी बदल पाहू इच्छितो. पण या 'अब की बार, चारसौ पार' घोषणेची उत्पत्ती खूप मनोरंजक आणि भावनिक आहे. कलम ३७० हा आमच्यासाठी, आमच्या कार्यकर्त्यांसाठी आणि भारतातील लोकांसाठी अतिशय भावनिक मुद्दा आहे. हे घडण्याची पिढ्यान् पिढ्या लोक वाट पाहत होते. कलम ३७० रद्द करणे ही अनेक दशकांपासून आमच्या कार्यकर्त्यांसाठी एक प्रेरक शक्ती राहिली आहे. आमच्या सरकारने हे केल्याचे पाहून लोक खूप भावूक झाले आणि कलम

## CONGRESS MANIFESTO 2024

**1.** Congress will conduct a nation-wide Socio-Economic and Caste Census to enumerate the castes and sub-castes and their socio-economic conditions. Based on the data, we will strengthen the agenda for affirmative action.

**5.** The economic empowerment of minorities is a necessary step for India to realise its full potential. We will ensure that banks will provide institutional credit to minorities without discrimination.

**6.** We will ensure that the minorities receive their fair share of opportunities in education, healthcare, public employment, public works contracts, skill development, sports and cultural activities without discrimination.

# कल्पना विकास विरोधी

३७० रद्द करणाऱ्या पक्षाला ३७० जागा द्यायला हव्यात, अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली. आणि म्हणूनच एनडीएसाठी 'अब की बार, ४०० पार' असा नारा दिला गेला. तो जनतेतून निर्माण झाला. ही एक अलौकिक आणि यापूर्वी कधीही न अनुभवलेली घटना होती. म्हणून लोक स्वतःच आमच्या विजयाचे लक्ष्य ठेवत आहेत.

**प्रश्न–** तुम्ही म्हणत आहात तसे जर झाले तर तुम्ही देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंच्या सलग तीन विजयांच्या विक्रमाशी बरोबरी कराल. तुम्ही आणि नेहरू वेगवेगळ्या राजकीय पार्श्वभूमीमधून आलेला आहात. या परिप्रेक्ष्यातून तुम्ही या विजयाकडे कसे पाहता?

**पंतप्रधान :** खरे सांगायचे तर मला या विक्रमांबद्दल माहिती नाही. याबाबतच्या वस्तुस्थितीचे विश्लेषण करणे हे तुमचे काम आहे. मी फक्त माझे काम करीत राहतो; पण तुम्ही हा प्रश्न विचारला असल्याने मी तुम्हालाच याचे विश्लेषण करण्याची विनंती करीन. त्या वेळची राजकीय परिस्थिती, विरोधी पक्ष आणि त्यांचे नेते पाहू शकाल. त्या वेळी आपण नागरिकांमध्ये त्यांच्या हक्कांबाबत असलेली जाणीव; तसेच त्यांच्या शिक्षणाची पातळी पाहू शकता. त्या वेळी प्रसारमाध्यमांची काय स्थिती होती, याचाही अभ्यास करू शकता. पंडित नेहरूंच्या १० वर्षांच्या तुलनेत आमच्या दहा वर्षांत देशाची प्रगती कशी झाली, याचे विश्लेषण व्हायला हवे. आपण अत्यंत महत्त्वाच्या वळणावर आहोत. कारण देश पुढील २५ वर्षांचा 'रोडमॅप' तयार करीत आहे आणि त्यातून नागरिकांचेही आयुष्य अधिक समृद्ध होणार आहे.

**प्रश्न–** 'भाजप नेते खूप उद्धट झाले आहेत आणि २००४ मध्ये 'इंडिया शायनिंग' असा प्रचार केल्यानंतर भाजपचा पराभव झाला होता, त्याप्रमाणेच अशाच धक्कादायक पराभवाच्या दिशेने भाजपचा प्रवास होत आहे,' असे विधान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले आहे. आपली प्रतिक्रिया काय? सन २००४ मध्ये भाजपपासून मित्रपक्ष दुरावले होते. या वेळी मात्र भाजपच्या मित्रपक्षांमध्ये नव्याने भर पडत आहे.

**पंतप्रधान :** दुसऱ्याच्या उद्धटपणाविषयी बोलणे काँग्रेस पक्षाच्या 'युवराजांना' शोभत नाही. मात्र, काँग्रेसला आता अशा धक्कादायक व चकित करणाऱ्या गोष्टींवरच अवलंबून राहावे लागते, हे सत्य आहे. काही तरी चमत्कार घडेल आणि आपण ही निवडणूक जिंकू, अशी काँग्रेसला आशा आहे. काँग्रेसच्या अनेक ज्येष्ठ आणि महत्त्वाच्या नेत्यांनीही शस्त्रे टाकली आहेत आणि पराभव मान्य केला आहे. सर्व निवडणुका या त्या-त्या वेळच्या मुद्द्यांवर लढवल्या जात असतात. त्यामुळे, कोणत्या दोन निवडणुकांची तुलना होऊ शकत नाही. सन २०२४ मध्ये आम्हाला नवे मित्रपक्ष मिळत आहेतच; त्याचबरोबर जनतेकडून अभूतपूर्व पाठिंबा मिळत आहे. त्यातून या निवडणुकीत दणदणीत विजय मिळेल, असा विश्वास आम्हाला वाटत आहे.

**प्रश्न–** तुम्ही राज्यघटना बदलणार आहात या विरोधकांच्या आरोपाकडे तुम्ही कसे पाहता?

**पंतप्रधान :** ज्यांनी राज्यघटनेत अनेकदा बदल केले त्यांनी आमच्यावर आम्ही राज्यघटना बदलून टाकू असा आरोप करणे दुर्दैवी आहे. पण हा प्रश्न विचारण्यापूर्वी तुम्ही माझा आत्तापर्यंतचा प्रवास पाहायला हवा. तुम्ही मी केलेल्या कार्याचा अभ्यास करायला हवा आणि मुख्यमंत्री असल्यापासून घेतलेल्या निर्णयांचा मागोवा घ्यायला हवा. मग यामध्ये घटना बदलण्यासारखे काही निर्णय घेतले गेले काय तेही तुम्ही पाहा. कुणी तरी आरोप करते आणि तुम्ही तेच आरोप हाताशी धरून मला प्रश्न विचारता हे अयोग्य आहे.

**प्रश्न–** देशाच्या अर्थव्यवस्थेचा आकार वाढला आहे; मात्र समानता व असमानता यांविषयी चर्चा होत आहे. त्यामुळे संपत्तीकर व वारसा कर हा त्यावर उपाय आहे, असे तुम्हाला वाटते का?

**पंतप्रधान :** ही कल्पना शक्ती कितीही ताणली, तरी संपत्ती कर किंवा वारसा कर हा उपाय आहे, असे मला वाटत नाही. किंबहुना, उपायाच्या रूपात असणाऱ्या या धोकादायक समस्या आहेत. फेरवाटपाच्या नावाखाली तुम्ही कमावलेला पैसा सरकार काढून घेणार असेल, तर तुम्ही रात्रंदिवस काम करणार का? आज आम्ही देशातील तीन कोटी महिलांना 'लखपतीदीदी' करून त्यांचे सबलीकरण करत आहोत.


मात्र, सरकार तुमचा पैसा काढून घेणार असेल, तर महिलांना लखपती व्हावे वाटणार नाही आणि कोणत्याही प्रगतीची महत्त्वाकांक्षा राहणार नाही. एखाद्याने मुद्रा कर्ज काढले असेल आणि तो प्रगती करत असेल, तर अशा धोरणांमुळे त्याची प्रगती थांबून जाईल. केंद्र सरकारच्या धोरणांमुळे आमचे रस्त्यांवरील विक्रेते प्रगती करत आहेत; मात्र वरील धोरण आले तर ते प्रगती करू शकणार नाहीत. 'स्टार्टअप'च्या इकोसिस्टीमचा विचार केला, तर भारतीय अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र, अशा धोरणांमुळे युवकांच्या माध्यमातून होणारी 'स्टार्टअप' क्रांती संपून जाईल. फक्त आपल्या मतपेढीचे तुष्टीकरण करणारे हे धोरण आहे.

तुम्हाला नागरिकांचा विकास करण्याची इच्छा असेल, तर त्यांच्या मार्गातील अडथळे दूर करा आणि त्यांचे सबलीकरण करा. यातून नागरिकांमधील उद्योजकतेच्या क्षमतेला वाव मिळेल. देशातील दुसऱ्या व तिसऱ्या श्रेणीतील शहरांमध्ये हा बदल दिसत आहे. या शहरांमधून 'स्टार्टअप' आणि क्रीडा क्षेत्रातील अनेक चमकते तारे उदयाला येत आहेत.

या कारणांमुळेच संपत्तीचे फेरवितरण, संपत्ती कर यशस्वी होणार नाही. यातून दारिद्र्य संपणार नाही. यामध्ये संपत्तीचे फेरवितरण अशा पद्धतीने होईल की त्यात सर्वच जण गरीब होऊन जातील. अशा धोरणांमुळे गरीब नागरिक दारिद्र्यालाच चिटकून बसतील आणि संपत्तीची निर्मिती थांबून जाईल. दारिद्र्य हीच ओळख होऊन जाईल. ही धोरणे समानतेच्या मार्गातील अडथळे ठरतील. यातून द्वेष वाढेल आणि देशातील आर्थिक व सामाजिक वीण उसवण्याचा धोका आहे.

**प्रश्न–** 'उज्ज्वला'पासून पंतप्रधान आवास योजना अशा कल्याणकारी योजना २०१९ मध्ये तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रथमच मोठ्या प्रमाणात पोहोचल्या होत्या. या योजनांचा फायदा झाल्याचे मान्य करीत, नागरिकांनी भाजपला मतदान केले. यावेळी या योजना नव्या राहिलेल्या नाहीत. त्यामुळे या योजनांचा मतदारांवरील प्रभाव तितक्याच प्रमाणात कायम राहील, असे तुम्हाला वाटते का?

**पंतप्रधान :** भाजपाचे संकल्प पत्र काळजीपूर्वक पाहिले, तर तुमच्या लक्षात येईल, की आम्ही या योजनांची व्याप्ती वाढवली आहे; त्याचबरोबर गरिबांच्या सध्याच्या आकांक्षांचा विचार करून या योजनांची नव्याने मांडणी केली आहे. यामध्ये मुद्रा योजनेचे उदाहरण पाहिले, तर या योजनेतून आम्ही उद्योजकतेची क्रांती केली. आता समाजातील आकांक्षा आणि आमच्या उद्योजकांची गरज लक्षात घेऊन, त्यातील कर्जाची रक्कम दुप्पट करण्यात आली आहे. विजेचा विचार केला, तर देशातील १८ हजार गावे आणि तीन कोटींपेक्षा जास्त घरांमध्ये पहिल्यांदाच वीज पोहोचली होती. **आता पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना आणली आहे. यातून, नागरिकांना मोफत वीज मिळू शकणार आहे.** 'स्टार्टअप'चा विचार केला, तर आम्ही काही प्रोत्साहनात्मक धोरणे आणली आणि 'स्टार्टअप' सर्व प्रकारचे साह्य मिळेल, याची काळजी घेतली. आता भारत हे 'स्टार्टअप'चे हब व्हावे, अशी आमची इच्छा आहे. या वाटचालीमध्ये सलगता आहे आणि यश येत असल्यामुळे त्यात बदल होऊ नये, अशी आमची इच्छा आहे. आम्ही या योजनांची व्याप्ती आणि त्यांचा आकार यांविषयीही नव्याने विचार करत आहोत. दारिद्र्यातून बाहेर पडलेल्या व्यक्तींना पुन्हा दारिद्र्यात जावे लागू नये, याची काळजी घ्यावी लागणार आहे. आमच्या या धोरणांमधून जनतेच्या आकांक्षा पूर्ण होतील आणि विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होण्यास मदत होणार आहे. आम्हाला साध्य होऊ शकतील, असे मुद्देच आमच्या संकल्प पत्रात नमूद करण्यात आले आहेत. कधीही पूर्ण होऊ शकणार नाहीत, अशा प्रकारची खोटी आणि अव्यवहार्य आश्वासने देण्यावर आमचा विश्वास नाही.



## समान नागरी कायदा लागू करू

**भाजपशासित राज्ये समान नागरी कायदा राबवण्याविषयी आधीच विचार करू लागली आहेत. समान नागरी कायदा राबवणारे उत्तराखंड हे पहिले राज्य ठरले आहे. वेगवेगळ्या समाजांसाठी वेगवेगळे कायदे असणे हे देशासाठी हानीकारक आहे. एखादा समाज राज्यघटनेतील तरतुदींचा लाभ उठवून प्रगती करत असेल आणि त्याचवेळी दुसरा समाज तुष्टीकरणाचा बळी ठरत असेल तर आपण एक देश म्हणून विकास करू शकत नाही.**







**प्रश्न–** रोजगाराच्या संकल्पनेचा विस्तार करत सरकारी नोकऱ्यांपलीकडे जात स्वयंरोजगाराला चालना देण्याचे काम तुम्ही केले आहे. हे मूल्यांकन बरोबर आहे का? तुमचे हे प्रयत्न फलद्रुप होताना दिसत आहेत काय?

**पंतप्रधान :** सरकारी व खासगी क्षेत्र असो की स्वयंरोजगार असो, तरुणांसाठी संधी वाढवण्यावर आमचा भर आहे. सरकारी क्षेत्र, खासगी क्षेत्र आणि स्वयंरोजगार यांमध्ये संधी निर्माण करणारा काळ म्हणून आमची १० वर्षे लोकांच्या लक्षात राहतील. एखादी नोकरी चांगली की वाईट याची चर्चा करण्यापेक्षा तरुणांना उपलब्ध असणाऱ्या संधींमध्ये वाढ करण्यावर आम्ही भर दिला आहे. याचे परिणाम दिसत आहेत. सन २०१७ ते २०२३ मधील वार्षिक पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे (पीएलएफएस) नुसार कामगारांच्या योगदानाची टक्केवारी ४९.८ टक्क्यांवरून ५७.९ टक्क्यांवर पोहोचली आहे. बेरोजगारीची टक्केवारी ६ टक्क्यांवरून घटून ३.२ टक्क्यांवर आली आहे. सन २०१७ ते २०२४ या काळात कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी संघटनेच्या (ईपीएफओ) सभासदांमध्ये सात कोटींहून अधिक सभासदांची भर पडली आहे. केवळ मुद्रा कर्ज योजनेचा विचार करता आठ कोटींहून अधिक नवे व्यवसाय सुरू झाले आहेत आणि प्रत्येक नव्या व्यवसायाने एक ते दोन व्यक्तींना आधार दिला आहे. म्हणजेच १५ कोटींहून अधिक संधी तयार झाल्या आहेत. यामध्ये स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया कर्जे आणि स्वनिधी कर्जांची भर पडली आहे. यामुळे उद्योजकता क्षेत्राचा चेहरामोहराच बदलला आहे! काही वर्षांपूर्वीपर्यंत अंतराळ या क्षेत्राचा विचारच होत नसे. हे क्षेत्र आज चांगल्या प्रकारे प्रगती करत आहे. हंगामी तत्त्वावर रोजगार, अर्थात 'गिग इकॉनॉमी' अंतर्गतदेखील लाखो नागरिकांना रोजगार मिळाला आहे. यामधील २० टक्क्यांपेक्षा अधिक जण उच्च कौशल्ये आवश्यक असलेल्या नोकऱ्यांमध्ये सामावून घेतले गेले आहेत. डिजिटल अर्थव्यवस्थाही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या अर्थव्यवस्थेत २०१९ पर्यंत सहा कोटींपेक्षा अधिक रोजगारांची निर्मिती झाली. ही संख्या कदाचित येत्या काही वर्षांत दुप्पट होईल. एका अहवालानुसार, स्थावर मालमत्ता क्षेत्रात तीन कोटींहून अधिक रोजगार निर्माण झालेले दिसत आहेत. मी नियमित रोजगार मेळाव्यांना हजर राहतो. हे रोजगार मेळावे म्हणजे सरकारी नोकऱ्या देणाऱ्या सर्वांत मोठ्या मोहिमा असतात. तिथे आम्ही लाखो युवकांना नियुक्तिपत्रे देतो.

**प्रश्न–** दक्षिण भारतातील पक्षाच्या यशाबद्दल कितपत आशावादी आहात? तुम्ही तमिळनाडू आणि केरळमध्ये जोरदार प्रयत्न केले आहेत...

**पंतप्रधान :** दक्षिण भारतात भाजपाचे भवितव्य चांगले आहे. खरे तर मी तेथे जोरदार प्रयत्न केले आहेत असे नाही, तर याउलट आहे. दक्षिण भारतातील जनतेनेच भाजपाच्या यशासाठी मोठे प्रयत्न केले आहेत. तुम्ही दक्षिणेत कुठेही जा, लोकांनी दाखवलेला स्वीकार आणि आपुलकी अभूतपूर्व आहे. दक्षिण भारतातील लोकांनी आतापर्यंत फक्त काँग्रेस किंवा प्रादेशिक पक्षांची सरकारे पाहिली आहेत. या पक्षांनी केवळ भ्रष्टाचार, घराणेशाही, कुशासन, फुटीरता, व्होटबँकेचे राजकारण आणि अत्यंत प्रतिगामी दृष्टिकोन कसा ठेवला हे त्यांनी पाहिले आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरेबद्दल लोकांना त्यांचा द्वेषही दिसून आला आहे. या कारणांमुळे लोक काँग्रेस आणि प्रादेशिक पक्षांना कंटाळले आहेत. दुसरीकडे, लोकांनी केंद्रातील आमचा कारभार पाहिला आहे आणि आमच्या कल्याणकारी योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचल्याचेही पाहिले आहे. त्यांना भाजपामध्ये आशेचा किरण दिसत आहे आणि ते भाजपाकडे विश्वासार्ह पर्याय म्हणून पाहत आहेत. सन २०१९ मध्ये भाजपा हा दक्षिण भारतातील सर्वांत मोठा पक्ष होता आणि यावेळी तो मोठ्या फरकाने सर्वांत मोठा पक्ष असेल. दक्षिणेतील निकालांमुळे यावेळी अनेक समज दूर होतील. आमचा तेथील 'मताचा वाटा' आधीच वाढला आहे आणि आमचा मताचा वाटा आणि जागांचा वाटाही मोठ्या प्रमाणात वाढलेला तुम्हाला दिसेल.



**प्रश्न–** गेल्यावेळी भाजपने लोकसभेत कर्नाटकात मोठा विजय मिळविला होता, पण विधानसभा निवडणुकीत भाजपला मोठा धक्का बसला होता. यावेळी त्या राज्यातून तुमची खासदार संख्या घटेल, अशी चर्चा आहे. तुमचे मत काय आहे?

**पंतप्रधान :** ही चर्चा आपण प्रत्येक निवडणुकीत ऐकत आलो आहोत. जे लोक आमची संख्या कमी झाल्याबद्दल बोलत आहेत ते स्वतःच पन्नासेक जागांपर्यंत खाली आले आहेत. कर्नाटकच्या जनतेचे आणि भाजपचे विशेष नाते आहे. भाजपला २०१९ मध्ये मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. यावेळीही आम्ही कर्नाटकात सर्व २८ जागा मिळवू. गेल्या दहा वर्षांत आमच्या सरकारने आर्थिक विकास, राष्ट्रीय सुरक्षा आणि विविध कल्याणकारी कार्यक्रम या आघाड्यांवर केलेल्या जोरदार कामाचा फायदा आम्हाला नक्की मिळेल. त्यामुळे एनडीए आघाडी कर्नाटकातील सर्व जागा जिंकेल, याची खात्री आहे. धर्मनिरपेक्ष जनता दल (जेडीएस) 'एनडीए'त सामील झाल्याने आमची आघाडी आणखी मजबूत झाली आहे. राज्य संकटात असताना काँग्रेसचे नेते मुख्यमंत्री होण्यासाठीच्या लढाईत व्यग्र आहेत. काँग्रेस सरकारच्या सदोष आणि अर्धवट कारभारामुळे राज्यातील जनतेची फसवणूक झाली आहे. त्यांच्या आश्वासनांची अंमलबजावणी होत नाही. राज्यात वाढत्या अराजकतेला जनता कंटाळली आहे.

राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे काम रखडले आहे. कर्नाटकातील वाढती वीजकपात आणि पाण्याची कमतरता यामुळे लोक त्रस्त आहेत. राज्यातील निवडणुकीत काँग्रेसला मत दिल्याचा कर्नाटकातील जनतेला पश्चात्ताप होत आहे. त्यामुळे यावेळी कर्नाटकातील जनता पुन्हा एकदा सिद्ध झालेल्या मोदी गॅरंटीवर विश्वास ठेवेल.

**प्रश्न–** कर्नाटक आणि तेलंगण या राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने मिळविलेल्या विजयात 'गॅरंटी' या संकल्पनेचा महत्त्वाचा वाटा होता. तुम्ही सांगत असलेली 'मोदी की गॅरंटी' ही संकल्पना त्यावर मात करील असे वाटते का?

**पंतप्रधान :** माझ्यासाठी 'गॅरंटी' अर्थात हमी हा विचार त्या शब्दापेक्षा किती तरी पटीने जास्त आहे. ही माझ्यासाठी अतिशय पवित्र अभिव्यक्ती आहे. हे सारे माझ्या मेहनतीशी आणि माझ्या विश्वासार्हतेशी जोडलेले आहे. माझ्या संपूर्ण आयुष्यातील लोकसेवेचा हा परिणाम आहे. जेव्हा मी 'गॅरंटी'बद्दल बोलतो, तेव्हा मला सर्वसामान्यांसाठी आणखी कठोर परिश्रम घेणे कमप्राप्त असते. जेव्हा मी माझ्या 'गॅरंटी'ला इतके महत्त्व देतो, तेव्हा साहजिकच लोकांनाही ते कळते. 'मोदी हमी देतात, ती पूर्ण करतात, मग परिस्थिती कशीही असो,' हे जनतेला दिसते. नळजोडणी देण्यापासून ते रेशनवरील धान्यापर्यंत, गरिबांसाठी घरे बांधण्यापासून एक्स्प्रेस-वेपर्यंत मोदी जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करीत आहेत. मोदींच्या 'गॅरंटी'ला कोणतीही विशिष्ट बंधने नाहीत.

काँग्रेस पक्षासाठी त्यांची आश्वासने म्हणजे मते मिळवण्यासाठी लोकांना मूर्ख बनवण्याचा एक मार्ग आहे. त्यांना ना विश्वासार्हता आहे, ना आश्वासनांची पूर्तता करण्याचा हेतू! स्वातंत्र्यानंतर त्यांनी अनेक हमी दिल्या होत्या. त्यांच्या सर्वांत मोठ्या नेत्याने दिलेल्या सर्वांत मोठ्या 'गॅरंटी'चे काय झाले ते पाहा. काँग्रेसच्या पंतप्रधानांनी गरिबी हटवण्याची भाषा केली होती; पण अनेक दशके काहीच झाले नाही. घर, शौचालय, पाण्याचे कनेक्शन अशा मूलभूत गरजांविना गरीब जगत होते. भ्रष्टाचार अव्याहतपणे सुरूच होता. भारतासोबतच स्वतंत्र झालेले देश आपल्या अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपल्यापेक्षा खूप पुढे गेले. 'एनडीए' सत्तेत येण्यापूर्वी भारताची स्थिती नाजूक होती. त्यामुळे 'मोदी की गॅरंटी' आणि काँग्रेसने न पाळलेली आश्वासने यांची तुलनाच होऊ शकत नाही.


**प्रश्न–** काँग्रेसने भाजपावर कर्नाटकात जातीय ध्रुवीकरणाचा प्रयत्न केल्याचा आरोप केला आहे, तर भाजपने तुष्टीकरणाचा आरोप केला आहे. तुम्ही याकडे कसे पाहता?

**पंतप्रधान :** प्रसारमाध्यमांनी आरोपांकडे नव्हे, तर कृतीकडे पाहावे, असे मला वाटते. कर्नाटकात नेमके काय घडले ते बघा. बॉम्बस्फोट, मुलीची निर्घृण हत्या, भजन-कीर्तन करणाऱ्यांवर हल्ला. बॉम्बस्फोटांच्यावेळी राज्य सरकारने जनतेची दिशाभूल करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. मुलीच्या खुनात वडील कसे न्याय मागत आहेत, हे प्रसारमाध्यमे दाखवत आहेत. ते काँग्रेस पक्षाचे आहेत; पण तरीही त्यांना न्याय मिळत नाही. हे तुष्टीकरण नाही तर काय आहे? काँग्रेसने धर्माच्या आधारे आरक्षण देण्यासाठी घटनाबाह्य कायदे केले आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. हे सांगणे म्हणजे ध्रुवीकरण नव्हे. आपल्या राज्यघटनेत धर्माच्या आधारे आरक्षण देण्यास स्पष्ट मनाई आहे; परंतु कर्नाटक काँग्रेस सरकारने ओबीसींना आरक्षण देण्यासाठी भाजपाने मंजूर केलेला कायदा बदलला आणि सर्व मुस्लिमांना ओबीसी कोट्यातून आरक्षण दिले.

राष्ट्रीय मागासवर्ग आयोग या घटनात्मक संस्थेनेही ही बाब सामाजिक न्यायाच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याची टीका केली होती. तेलंगण काँग्रेस सरकारने नुकतेच कर्नाटक काँग्रेस सरकारच्या या निर्णयाची पुनरावृत्ती करणार असल्याचे म्हटले आहे. यावरून काँग्रेसला देशभरातील अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना देण्यात येणारे आरक्षण कमी करून अल्पसंख्याकांना द्यायचे आहे, हे सिद्ध होते. देशाच्या साधनसामग्रीवर अल्पसंख्याकांचा पहिला हक्क आहे, असे ज्या पक्षाचे पंतप्रधान म्हणत होते. त्यांच्याकडून आणखी काय अपेक्षा करता येईल? ■

# काँग्रेसचे संपत्तीच्या फेरवाटपाचे घातक आश्वासन

काँग्रेसने या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात नागरिकांच्या सामाजिक आणि आर्थिक पाहणीचे आश्वासन दिले आहे. जाहीरनाम्यातील भाषेनुसार नागरिकांची ही पाहणी देशव्यापी असणार आहे. जाहीरनाम्यातच काँग्रेसने देशातील अल्पसंख्यकांच्या हक्कांविषयी आश्वासने दिली आहेत. शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक क्षेत्रातल्या नोकऱ्या, सरकारी कामांची कंत्राटे, कौशल्य विकास, क्रीडा आदी क्षेत्रार अल्पसंख्यकांना त्यांच्या न्याय्य वाटा देण्यात येईल, असे काँग्रेसने म्हटले आहे. काँग्रेसला मुळात देशातील नागरिकांची आर्थिक पाहणी का करावयाची आहे, हा यक्ष प्रश्न आहे.



**काँग्रेसचे** युवराज राहुल गांधी यांनी प्रचारसभेत सांगितले आहे की, नागरिकांच्या आर्थिक आणि सामाजिक पाहणीनंतर देशातील संपत्तीचे लोकसंख्येच्या प्रमाणानुसार फेरवाटप करण्याचे काम हाती घेण्यात येईल. काँग्रेसचा जाहीरनामा आणि राहुल गांधी यांची वक्तव्ये पाहिल्यावर अनेक प्रश्न निर्माण होतात. नागरिकांची आर्थिक पाहणी करणार म्हणजे भारतीयांच्या उत्पन्नाची माहिती गोळा केली जाणार आहे का? असा प्रश्न सर्वप्रथम उपस्थित होतो. देशाच्या एकूण दरडोई उत्पन्नापेक्षा उत्पन्न असणाऱ्याकडील उत्पन्न सरकार दरबारी जमा होणार का? ज्यांच्याकडून आधीच आयकर घेतला जातो त्यांनाही पुन्हा या रूपाने कर द्यावा लागणार का? सर्व संपत्तीचे फेरवाटप होणार की, फक्त आर्थिक स्वरूपाचे मालमत्तेचे फेरवाटप होणार? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे काँग्रेसला द्यावी लागणार आहेत. जाहीरनाम्यात दिलेले आश्वासन, राहुल गांधींनी जाहीर सभेतून केलेले वक्तव्य यावरून काँग्रेसने संपत्तीचे फेरवाटप आणि नागरिकांच्या आर्थिक, सामाजिक सर्वेक्षणाविषयी ठोस आराखडा तयार केला असेलच, असे वाटते आहे.

भारतीय नागरिकांकडे जमीन-जुमला, सोने-नाणे आणि रोख रक्कम अशा स्वरूपात संपत्ती असते. या संपत्तीची पाहणी करून त्याचे मूल्यांकन कसे केले जाणार याचेही उत्तर काँग्रेस नेतृत्वाने द्यायला हवे. श्रीमंत शेतकऱ्यांच्या जमिनी, खाजगी ट्रस्ट, धार्मिक ट्रस्ट, धार्मिक संस्था यांच्याही जमिनरूपी मालमत्तेची पाहणी केली जाईल का? धार्मिक ट्रस्ट आणि धार्मिक संस्थांच्या मालमत्तेची पाहणी करताना अल्पसंख्याक धर्मियांच्या ट्रस्ट आणि संस्थाच्या मालमत्तेचेही सर्वेक्षण केले जाणार का? की अल्पसंख्याक ट्रस्ट आणि धार्मिक संस्थांना या सर्वेक्षणातून वगळले जाणार. असे अनेक प्रश्न काँग्रेसच्या जाहीरनाम्यातून उभे ठाकले आहेत. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात अल्पसंख्यकांना त्यांचे न्याय्य हक्क देण्याची भाषा केली आहे. याचा दुसरा अर्थ नागरिकांच्या आर्थिक सर्वेक्षणातून अल्पसंख्याक धर्मियांना वगळले जाणार का? फक्त बहुसंख्यकांच्या म्हणजे, हिंदू धर्मियांच्याच मालमत्तेचे, संपत्तीचे सर्वेक्षण केले जाणार का? असेही प्रश्न काँग्रेसच्या



जाहीरनाम्यामुळे उपस्थित झाले आहेत. समाजातील सर्व थरातील नागरिकांच्या मालमत्तेचे फेरवाटप केले जाणार की फक्त धनाढ्य, सुबत्ता असलेल्या नागरिकांची मालमत्ताच फेरवाटपासाठी ग्राह्य धरली जाणार, असाही प्रश्न सर्वसामान्य नागरिकांच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. बँकेतील नोकरदार, शिक्षक, प्राध्यापक हा वर्ग काही वर्षापूर्वी मध्यमवर्ग म्हणून ओळखला जात होता. आता या वर्गाचे रूपांतर उच्च मध्यमवर्गात झाले आहे. या वर्गाकडे स्वत:चे घर, भूखंड, दाग-दागिने या स्वरूपातील मालमत्ता तयार झाली आहे. या वर्गाची ही स्वकष्टार्जीत मालमत्ताही फेरवाटपासाठी ग्राह्य धरणार का? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

काँग्रेसने अलिकडे जातनिहाय जनगणनेची मागणी सातत्याने केली आहे. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात या मुद्याचा उल्लेख आहेच. त्याला जोडूनच नागरिकांच्या मालमत्ता सर्वेक्षणाचा मुद्दा काँग्रेसने पुढे आणला आहे. काही वर्षापूर्वीपर्यंत भारतात आयकर, देणगी कर (गिफ्ट टॅक्स), संपत्ती कर आणि मालमत्ता शुल्क असे चार थेट कर अस्तित्वात होते. काळाच्या ओघात यातील आयकर वगळता तीन कर रद्द झाले. मिळालेल्या देणग्यांवरील कर वेगळ्या पद्धतीने आयकरात समाविष्ट केला गेला. संपत्ती कर (वेल्थ टॅक्स) रद्द केला जाऊन त्याजागी अतीश्रीमंत वर्गाला आयकर रचनेत सरचार्ज लावला गेला. मालमत्ता कर (इस्टेट ड्यूटी) मात्र कायमचा रद्द झाला. १९८५ मध्ये इस्टेट ड्यूटी रद्द झाली. त्यावेळी केंद्रात राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील सरकार होते. त्यावेळी इंदिरा गांधी यांची सर्व संपत्ती, इस्टेट राजीव गांधींना मिळणार होती. इस्टेट ड्यूटी रद्द होण्याचा आणि इंदिरा गांधींची इस्टेट राजीव गांधींना मिळण्याचा संबंध कोणी जोडू नये. काँग्रेसच्या जाहीरनाम्यात भारतीय नागरिकांच्या संपत्तीचे पुनर्वितरण करण्याचा मुद्दा असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरसभेत सांगितल्यावर लगेचच सॅम पित्रोदा यांनी अमेरिकेप्रमाणे भारतात नागरिकांच्या मालमत्तेवर ५५ टक्के वारसा कर (इनहेरिटन्स टॅक्स) लागू करण्याची कल्पना मांडली. गांधी घराण्याचे निकटवर्तीय म्हणून ओळख असणाऱ्या सॅम पित्रोदा यांनी हे वक्तव्य केल्यावर काँग्रेसने तातडीने या वक्तव्याशी काँग्रेसचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले. आपला देश पै न पैची बचत करून गंगाजळी जमवणारा देश म्हणून ओळखला जातो. भारतीयांच्या संस्कृतीत पैसा आणि संपत्तीच्या उधळपट्टीला त्याज्य ठरविले गेले आहे. कष्टाने, अक्कलहुशारीने मिळवलेले पैसे आपल्या वारसदारांना, पुढच्या पिढ्यांना मिळावे एवढी माफक अपेक्षा सर्वसामान्य भारतीयाची असते. अनेक भारतीय धार्मिक हेतूने, समाजोपयोगी कार्याला मदत म्हणून आपल्या मालमत्तेतील वाटा स्व:खुशीने देत असतात. विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भूदान चळवळीला अनेक भारतीयांनी आपल्या शेतजमिनीतील वाटा देऊन हातभार लावला होता. नोकरदार असो की व्यावसायिक असो प्रत्येक भारतीय नागरिक आयकर, व्यवसाय कर याच्या माध्यमातून सरकारला कर देत असतो. हयात असेपर्यंत तो सरकारचे सर्व कर भरत असतो. आयुष्यभर घाम गाळून जमवलेल्या मालमत्तेवर सरकारने हक्क दाखवण्याची कल्पना अत्यंत घातक आहे. आयुष्यभर कर भरायचे आणि मृत्यूनंतरही आपल्याच मालमत्तेवर कर लागणार असेल तर कोणताही नागरीक त्या सरकारला शिव्याशापच देणार.

एकदा का संपत्तीचे फेरवाटप झाले की देशात आबादी-आबादी होणार. सर्व नागरिकांकडे सारखी मालमत्ता राहून आर्थिक विषमता दूर होणार, असा काँग्रेसजनांचा समज आहे. फेरवाटप केल्यानंतरही समाजातील आर्थिक विषमता कायम असल्याचे दिसून आले तर मालमत्तेचे पुन्हा फेरवाटप करणार का? या प्रश्नाचे उत्तर काँग्रेसने आताच द्यायला हवे. अनेक नोकरदार, उद्योजक, व्यापारी, विक्रेते वडिलोपार्जित मालमत्ता नसतानाही स्वत:च्या कष्टाच्या बळावर मालमत्ता मिळवत असतात. शून्यातून विश्व उभे करणाऱ्या या भारतीयांच्या मालमत्तेवर काँग्रेसची नजर आहे. ही हुकूमशाही स्वरूपातील साम्यवादी मनोवृत्ती दाखवून राहुल गांधी आणि काँग्रेसने आपल्या अकेलेचे पुरते दिवाळे वाजले आहे, हेच दाखवून दिले आहे. ■


# संविधानाचा खरा मारेकरी काँग्रेसच

● अनंत सामंत

भाजपला ४०० जागा मिळाल्या तर ते संविधान बदलतील..! आपल्या बौध्दिक दिवाळखोरीचे तुषार उडवत संविधानाचे गांधीवादी मारेकरी संविधानाच्या नांवे काँग्रेसी मातम करु लागलेत..! संविधानाच्या पहिल्याच पानावरील श्रीरामांचे चित्र ज्या दिवशी काढून टाकले तोच संविधानात केलेला पहिला हस्तक्षेप होता..! केलेला पहिला बदल होता..! संविधानातून तुम्ही राम हटवलात.. पण तुमची सगळी पितरं जरी खाली उतरली.. बहात्तर हूर जरी अवतरले तरी करोडों हिंदुंच्या हृदयांत वसलेला राम हटवणं कुणाच्याही बापाला शक्य होणार नाही..!

**नेहरुजी–** १७. इंदिराजी– २८. राजीवजी– १०. मनमोहनजी (सोनियाजी)– ७ वेळा यांनी इतक्या वेळा संविधानात बदल केले हे खरं आहे की खोटं..? कायदामंत्री असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना डावलून नेहरुंनी गोपालस्वामी अय्यंगार यांच्या हातून कलम ३७०चा मसूदा तयार करुन लोकसभेत बळजबरीने मंजूरही करुन घेतला हे ही खोटं आहे..?

दि. १४.४. १९५४ रोजी ३५ (अ) ही घटना दुरुस्ती केली..! १९७६ मध्ये संविधान ४२ वी घटनादुरुस्ती करून धर्मनिरपेक्षतेचा समावेश केला आणि १९७५ ला आणिबाणी (हुकूमशाही) लादली तेंव्हाच सर्वार्थाने संविधान आणि लोकशाही धोक्यात आणली..!




**काँग्रेसने संविधानाद्वारे भारताला मुस्लिम राष्ट्र बनवले..!**

उदा.– अनुच्छेद २५, २८, ३० (१९५०).. HRCE कायदा (१९५१).. HCB MPL (१९५६).. धर्मनिरपेक्षता (१९७५).. अल्पसंख्यांक कायदा (१९९२).. POW कायदा (१९९१).. वक्फ कायदा (१९९५).. रामसेतू प्रतिज्ञापत्र (२००७).. केशर (२००९)..!

१) कलम २५– धर्मांतर कायदेशीर केलं..

२) कलम २८– हिंदुंकडून धार्मिक शिक्षण काढून घेतलं..!

३) कलम ३०– मुस्लिम ख्रिश्चनांना धार्मिक शिक्षणाचा अधिकार..!

४) HRCE.– हा कायदा लागू करुन सर्व मंदिरांचे पैसे हिंदुंकडून काढून घेण्यात आले..!

५) HCB कायदा– हिंदू कोडबिलाद्वारे घटस्फोट कायदा, हुंडा कायद्याचा हिंदुंवर बडगा..!




आणीबाणी लादून बाबासाहेबांच्या संविधानाचा सर्वात मोठा अपमान काँग्रेसने केला.

मात्र मुस्लिम वैयक्तिक कायद्याला स्पर्श केला नाही..! बहुपत्नीत्वाला कायदेशीर मान्यता देऊन त्यांची लोकसंख्या वाढवायला अधिकृत हातभार लावला..!

६) स्पेशल मॅरेज अॅक्ट (१९५४) – ह्या कायद्यांतर्गत मुस्लिम तरुण हिंदू मुलींशी सहज लग्न करु शकत होती..!

धर्मनिरपेक्ष – १९७५ साली आणीबाणी लादून संविधानात धर्मनिरपेक्षता जबरदस्तीने घूसवून हा देश धर्मनिरपेक्ष केला..!

७) अल्पसंख्य– १९९१ साली अल्पसंख्य आयोगाने कायदा आणून मुस्लिमांना अल्पसंख्य जाहीर केले..! जर हा देश धर्मनिरपेक्ष जाहीर केला.. तर मग अल्पसंख्य–बहुसंख्य भेद का आणि कसा..?

८) १९९२ मध्ये हिंदुंना त्यांची मंदिरे परत घेण्यापासून कायद्याने रोखण्यात आले..! ४०,००० मंदिरे व पूजास्थाने कायद्याने हिंदुंकडून काढून घेतली..!

९) १९९५ साली मुस्लिमांना कोणत्याही जमिनीवर हक्क सांगण्याचा अधिकार दिला.. आणि त्यांना रेल्वेनंतर दुसऱ्या क्रमांकाचे जमीनदार बनवले..!

१०) २००७ मध्ये सादर केलेल्या रामसेतू प्रतिज्ञापत्रात श्रीरामांचे अस्तित्वच नाकारले..!

११) २००९ मध्ये भगवा अतिरेकी शब्दप्रयोग करुन हिंदू धर्माला अतिरेकी ठरवलं..!

आज चर्च, मशिदी मुक्त आहेत, स्वतंत्र आहेत..! पण मंदिरे मात्र सरकारी पाशांत बंदिस्त आहेत..! संपत्तीवर चर्चचा, वक्फ बोर्डाचा अधिकार.. पण श्रीमंत मंदिरांवर प्रशासकाचा अधिकार..! ख्रिस्ती आणि मुस्लिम बोर्ड – ट्रस्टचे सदस्य फक्त त्याच धर्माचे.. पण हिंदुंच्या बोडक्यावर गैरहिंदुसुध्दा..! आयकर चर्च, मशिदींना माफ.. पण मंदिरांना लागू..! हिंदुंनी कुणाचेही देवस्थान, पूजार्चना स्थान, प्रार्थनाघर, प्रार्थनास्थळ हडप केलं नाही.. की त्यावर अधिकारही गाजवला नाही..! तरीसुध्दा काँग्रेस राजवटीने हिंदूंवर पूजास्थळ अधिनियम १९९५ का लादला..? नेता, नीती, नातं आणि नियत नसलेली काँग्रेस हा पक्ष राहिला नसून ही न्टि नॅशनल काँग्रेस नामक मुस्लिम संघटना झाली आहे..! हिंदू धर्म नष्ट करायला काँग्रेसने कायदे केले.. विधेयके वापरली.. त्यासाठी संविधानात मनमानी बदलही केले..!

निरक्षर जनतेला मूर्ख बनवून सहा दशकांहुन अधिक काळ सत्ता मनमुराद उपभोगलेली काँग्रेस आजच्या साक्षर भारतात त्याच मानसिकतेतून जनतेला मूर्ख समजण्याचा आणि बनवण्याचा तोच मूर्खपणा परत परत मूर्खपणे करतेयं..! आणि हाच आजच्या मूर्ख काँग्रेसच्या मूर्खपणाचा कळस आहे..! संविधानाच्या धारदार शस्त्राने हिंदू धर्मावर बेभानपणे सपासप वार करुन हिंदुंना रक्तबंबाळ करणारी काँग्रेस आज संविधान वाचवायची बचावात्मक बतावणी करते आहे.

देशाची एकात्मता आणि अखंडता अबाधित राखण्यासाठी संविधानात घूसवलेली विभाजनाची विद्वेषी विघातक कलमे काढुन मूळ संविधानाचं पावित्र्य राखायलाच हवंय..! हिंदुंना आपल्या मुलभूत हक्क अधिकारांसह ताठ मानेने सुरक्षित आणि उज्वल आयुष्य जगायचं असेल.. आपल्या देशाला सुजलाम–सुफलाम करायचं असेल तर पुन्हा एकदा नरेंद्र मोदींच्या हाती देशाची बागडोर बहुमतांनी सोपवावीच लागेल..! ■

# भाजपाचे संकल्पपत्र ही देशाच्या समृद्धीची गॅरंटी!




● उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

> भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर केलेले संकल्पपत्र हा केवळ कागदी आश्वासनांचा पेटारा नसून जनतेच्या आशा आणि अपेक्षा पूर्ण करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदींची गॅरंटी आहे. या संकल्पपत्रातील प्रत्येक संकल्प पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पार्टी संपूर्ण ताकदीने अथक परिश्रम करणार असून समाजातील शेवटच्या स्तरावरील व्यक्तीपर्यंत विकासाची फळे पोहोचविण्याचा पक्षाचा निर्धार आहे.

**महिला** शक्ती, युवा शक्ती, शेतकरी आणि गरीब या समाजघटकांना अधिक सक्षम करून देशाला समृद्ध करण्याची मोदी यांची गॅरंटी आहे. काँग्रेसचा जाहीरनामा हे त्यांच्या अपयशाचे प्रतिबिंब आहे, दीर्घ काळ सत्तेत असतानाही काँग्रेसने याआधी जाहीरनाम्यातून दिलेले एकही आश्वासन पूर्ण केलेले नाही.

भाजपाच्या संकल्प पत्रातील प्रत्येक मुद्दा ही रोजगारनिर्मितीची ग्वाही असून भाजपचा संपूर्ण जाहीरनामा रोजगारनिर्मितीला समर्पित आहे. देशभरातील सुमारे ३० लाख नागरिकांनी विविध माध्यमांतून केलेल्या सूचनांचा व्यापक विचार करण्यात आल्याने, भाजपाचे संकल्पपत्र सर्वसमावेशक आणि प्रत्येक समाजघटकाच्या विकासाचा विचार करणारे झाले आहे. देशातील ८० कोटी लोकसंख्येला पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेतून मोफत धान्य देण्याची योजना मोदी सरकारने २०२० मध्ये सुरू केली. ही योजना पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्याचा मोदी सरकारचा संकल्प असून, आयुष्मान भारत योजनेतून पाच लाखांपर्यंतचे आरोग्य संरक्षण, ७० वर्षावरील नागरिकांना मोफत उपचार, पीएमआवास योजनेतून आणखी तीन कोटी घरे, प्रत्येक घरात पाईपद्वारे घरगुती गॅसजोडणी, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून पहिल्या टप्प्यात एक कोटी घरांना सौरसंयंत्रे देऊन मोफत वीज, दहा लाखांपर्यंतच्या विनातारण कर्जाची मर्यादा वीस लाखांपर्यंत वाढविणे, सामान्य घरांतील महिलांना व तरुणांना व्याजमुक्त व विनातारण कर्ज मिळणार. पीएम किसान कल्याण योजनेअंतर्गत पुढील पाच वर्षांसाठी वार्षिक सहा हजार रुपये देण्याची मोदी यांची गॅरंटी आहे, महाराष्ट्रातील महायुती सरकार यामध्ये सहा हजाराची भर टाकत असल्याने शेतकऱ्यांना बारा हजार रुपयांचे अर्थसाह्य मिळत आहे. पीएम पीकविमा योजना अधिक मजबूत करण्यात येणार असून गेल्या पाच वर्षांत प्रमुख पिकांच्या

किमान आधारभत किमतीत वाढ करण्यात आलीआहे, पुढच्या पाच वर्षांत आणखी भरघोस वाढ करण्याची 'मोदी की गॅरंटी' आहे. डाळी आणि खाद्यतेल उत्पादनात आत्मनिर्भरता आणण्याची ग्वाही, भाजीपाल्यासारख्या नाशवंत पिकांचे उत्पादन वाढवून त्याच्या साठवणीकरिता स्वयंपूर्ण सुविधा उभ्या करून या पिकांना व उत्पादकांना आर्थिक सुरक्षितता देण्याचा मोदींचा संकल्प आहे. श्रीअन्नाकरिता जगभरातील बाजारपेठा उपलब्ध करून देऊन नैसर्गिक शेतीच्या विस्ताराच्या ठोस योजना आखण्यात आल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत मोदी सरकारच्या नियोजनातून सुमारे २५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. पुढच्या पाच वर्षांत सिंचनक्षेत्रात आणखी भर घालण्याच्या ठोस योजनाही तयार आहेत.

नॅनो युरिया हा मोदी सरकारचा प्रयोग यशस्वी ठरला आहे. त्याची व्यापक अंमलबजावणी करण्यात येणार असून जमिनीचा पोत टिकविण्याकरिता कार्यक्रम हाती घेतला जात आहे. शेती क्षेत्रावर वातावरणातील बदलाचे परिणाम अभ्यासून पिकांना संरक्षण देण्याकरिता स्वतंत्र उपग्रह सोडण्यात येणार असून या क्षेत्रातील लहान शेतकऱ्याकरिता पूर्णपणे उपलब्ध राहील असे डिजिटल तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरुणांकरिता पारदर्शक भरती प्रक्रिया, पेपरफुटीविरोधात कडक कायदा, स्टार्टअप्सच्या माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी आणि कौशल्याची क्षितिजे विस्तारण्याकरिता विशेष निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

उत्पादन क्षेत्राचा विस्तार करून जागतिक स्पर्धेत भारताला अव्वल दर्जा प्राप्त करून देणे व या क्षेत्रातील रोजगाराच्या संधींचा पुरेपूर फायदा घेता यावा यासाठी विशेष योजना, एमएसएमई क्षेत्राचा विस्तार, करप्रणालीत सुटसुटीतपणा व या क्षेत्रास अधिकाधिक पतपुरवठा ही रोजगार निर्मितीसाठी साह्यभूत ठरणारे संकल्पही जाहीर केले आहेत. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांकरिता किमान वेतनात भरघोस वाढ, व कायमस्वरूपी धोरणाची आखणी करण्यात येणार आहे. एक कोटी महिला गेल्या पाच वर्षांत लखपती दीदी झाल्या. पुढच्या पाच वर्षांत तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनवून सक्षम करण्याची मोदी सरकारची गॅरंटी आहे.

महिलाकरिता सार्वजनिक शौचालयांची साखळी, महिलांच्या आरोग्याच्या समस्यांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करणारे धोरण आखण्यात येणार असून, गर्भाशय व मुखाचा कर्करोगासारख्या आजारातू महिलांना पूर्णतः मुक्तता मिळवून देणारी योजना आखण्यात येत आहे. नारीशक्ती वंदना योजनेतून महिलांच्या सक्षमीकरणाची अंमलबजावणी, महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता पोलीस ठाण्यांत विशेष यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे. रेल्वे सेवेचे जाळे वाढवून प्रवासी वाहतुकीची क्षमता वाढविण्याची योजना तयार करण्यात येणार असून दर वर्षी पाच हजार किलोमीटर नवे रेल्वेमार्ग तयार करण्यात येतील. रेल्वे अपघात टाळणारी कवच यंत्रणा, जागतिक दर्जाच्या रेल्वेस्थानकांचे आधुनिकीकरण, वंदे भारत, अमृत भारत, नमो भारत ट्रेनचा विकास व निर्मिती देशातच होणार असून सुमारे १३ हजारांहून अधिक रेल्वे स्थानकांचा जागतिक दर्जाचा विकास करण्याचे काम सुरू झाले आहे.

भारत ही आर्थिक शक्ती म्हणून उदयास येत आहे. त्याप्रमाणे देशात सांस्कृतिक जागरणाची प्रक्रियादेखील वेगवान झाली आहे. काशी करिडॉर, अयोध्येतील राम मंदिराचे पुनर्निर्माण, आदी सांस्कृतिक वारशाचा विकास, संस्कृती आणि परंपरांचे जतन व संवर्धन करण्यासाठी विशेष निधी उभारण्याबरोबरच, साहित्य, संस्कृतीच्या जागतिक प्रसारासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असून भारताचा वैश्विक विचार जगात स्थापित करण्याचा प्रयत्न करण्याचा मोदी यांचा संकल्प आहे. भ्रष्टाचाराविरोधातील लढाई आणि राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मधील देशाच्या कर्तव्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे आखून देण्यात आलेली आहेत. संपूर्ण देशात समान नागरी कायदा असावा ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अपेक्षा ७५ वर्षांत पूर्ण झाली नाही. आता हा कायदा देशभर लागू करण्यात येणार आहे.

भारतीय सभ्यतेची प्रतीके पुनरुज्जीवित करून अमली पदार्था विरोधातील लढाई तीव्र करण्याचा मोदी यांचा संकल्प आहे. 'सीएए'ची व्यापक अंमलबजावणी, सुरक्षा दलांची क्षमतावृद्धी आणि विशेष म्हणजे, एक देश, एक निवडणूक या धोरणाची अंमलबजावणी ही मोदी यांची गॅरंटी आहे. आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाचे देशव्यापी कार्यक्रम राबविण्याचा भाजपाचा संकल्प आहे. २०१९ मध्ये मोदी सरकारने दिलेल्या जाहीरनाम्यातील सर्व ७५ आश्वासने पूर्ण करण्यात आली आहेत. ■

# विकसित भारताची हमी देणारे संकल्प पत्र

काँग्रेसने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर भारतीय जनता पार्टीचे संकल्प पत्र प्रसिद्ध करण्यात आले. काँग्रेसचा जाहीरनामा आणि भारतीय जनता पार्टीचे संकल्प पत्र यांची तुलना केल्यावर अनेक वर्षे देशावर सत्ता गाजवलेल्या काँग्रेसवर मतदारांना आकर्षित करण्यासाठी आश्वासनाचे शाब्दीक बुडबुडे सोडण्याची वेळ आली आहे, असे दिसते. स्वातंत्र्य चळवळीच्या पार्श्वभूमीतून जन्माला आलेल्या काँग्रेसच्या नेतृत्वावर मतदारांनी दीर्घकाळ विश्वास टाकला.




**स्वातंत्र्य** चळवळीत या पक्षाच्या नेतृत्वाने घेतलेल्या सहभागामुळे हा पक्ष संपूर्ण देशाचा प्रतिनिधी असल्यासारखे वातावरण त्या काळात होते. सामान्य माणसाचे याच कारणामुळे काँग्रेस नेतृत्वाशी भावनिक नाते निर्माण झाले होते. केंद्रातील सत्तेबरोबरच सामान्य भारतीयांनी अन्य राज्यांची सत्ताही काँग्रेसकडे मोठ्या विश्वासाने सोपविली होती. तरीही या पक्षाला आपल्या जाहीरनाम्यात गरीब हटाओसारख्या आश्वासन द्यावे लागते. यातील विसंगती काँग्रेसच्या सध्याच्या नेतृत्वाच्या ध्यानात येणे कठीण आहे. देशावर राज्य करून पाहणाऱ्या पक्षाने देशापुढील विविध प्रश्नांचा पुढील २०-२५ वर्षांच्या परिप्रेक्ष्यात आढावा घेऊन हे प्रश्न, या समस्या सोडवण्यासाठी आपण दृष्टीने काम करणार याचा आराखडा जाहीरनाम्याद्वारे मांडणे अपेक्षित असते. काँग्रेसकडे अशा भविष्यवेधी, देशापुढील प्रश्नांचे आकलन करण्याची क्षमता असणाऱ्या नेत्यांची वानवा आहे. त्यामुळे मतदारांना भुलवण्यासाठी पूर्ण न करता येणाऱ्या अव्यवहारिक आश्वासनांची खैरातच मतदानांवर करण्यात आली आहे.

याउलट भारतीय जनता पार्टीने आपले संकल्प पत्र सादर करताना गेल्या १० वर्षात मोदी सरकारने केलेल्या कामाचा हिशोब सादर केला आहे. याबरोबरच आगामी ५ वर्षात कोणत्या क्षेत्राला प्राधान्य दिले जाणार, हेही संकल्प पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचा संकल्प सोडला आहे. हा संकल्प सिद्धीस नेताना कोणत्या वाटेने जावे लागणार आहे, याची कल्पना असल्याने आगामी ५ वर्षात देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर नेण्याचे उद्दिष्ट संकल्प पत्रात ठेवण्यात आले आहे. महात्मा गांधी, पं.नेहरू यांच्यानंतर श्रीमती इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वावर भारतीय जनतेने मोठा विश्वास टाकला होता. सामान्य भारतीयांचे अलोट प्रेम इंदिरा गांधींना मिळाले. बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे यासारख्या निर्णयातून इंदिरा गांधी यांनी आपली प्रतिमा वंचित, कष्टकऱ्यांच्या तारणहार अशी तयार केली. १९७१ ची निवडणूक लढविताना इंदिरा गांधींनी सामान्य मतदाराला आकर्षित करण्यासाठी 'गरीबी हटाओ'चा नारा दिला होता.

काँग्रेसअंतर्गत संघर्षात पक्षांतर्गत ज्येष्ठ नेत्यांना आवाहन देण्यासाठी इंदिरा गांधी यांना गरीबी हटाओसारख्या लोकप्रिय घोषणेच्या आधाराची गरज होतीच. बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे यासारखे निर्णय घेतल्यामुळे साम्यवादी चळवळीतील भलीभली मंडळीही श्रीमती इंदिरा गांधी यांच्या पाठीमागे उभी राहिली. प्रत्यक्षात गरीबीचे उच्चाटन होण्याऐवजी ही समस्या अकराळ विक्राळ बनल्याचे सामान्य भारतीयांनी अनुभवले. काँग्रेसच्या सत्ताकाळात गरिबांच्या नावाने बनवलेल्या योजना कागदावरच राहिल्या. या योजनांचा निधी मध्यस्थ आणि दलालांच्या खिशात जाऊन बसला. २०१४ मध्ये सत्तेत आल्या–आल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शोषित, वंचित वर्गाची सरकारी बँकांमध्ये बँकखाती काढण्यासाठी पंतप्रधान जन–धन योजना सुरू केली. सरकारी योजनांचे लाभ, अर्थसहाय्य थेट गरिबांच्या हातात पडू लागले. अशा प्रकारची तंत्रप्रणाली विकसित करण्याची इच्छाशक्ती काँग्रेस नेतृत्वाने दाखवली नाही. अर्थतज्ज्ञ असलेल्या डॉ.मनमोहन सिंग, पी.चिदंबरम यांना २००४ ते २०१४ अशा सलग १० वर्षात जन–धनसारखी योजना का सुरू करता आली नाही'.

भारतीय जनता पार्टीने देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्दिष्टाने गेल्या १० वर्षात निर्णायक पावले टाकली आहेत. देशाला तिसऱ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनवण्याची महत्वाकांक्षा बाळगताना अनेक क्षेत्रात भारताला स्वयंपूर्ण बनावेच लागेल, याची मोदी सरकारला आणि भाजपा नेतृत्वाला कल्पना आहे. त्या दृष्टीने देशांतर्गत उत्पादनांना चालना देण्यासाठी मोदी सरकारने केलेल्या उपाययोजनांना भरघोस फळ मिळाले आहे.

२०२२–२०२३ मध्ये देशाच्या वस्तू आणि सेवांची निर्यात ७७६.४ बिलियन डॉलर्स एवढ्या विक्रमी पातळीला जाऊन पोहचली. २०१३–२०१४ मध्ये भारताची वस्तू आणि सेवांची निर्यात होती ४६८ बिलियन डॉलर्स. याचा अर्थ गेल्या १० वर्षात देशाची निर्यात ६५ टक्क्यांनी वाढली. यामागे मोदी सरकारने उत्पादन आणि निर्यात आघाडीवर घेतलेले नियोजनबद्ध परिश्रम आहेत.

देशातील उद्योजक, उद्योगपतींना निर्यातीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, आपली उत्पादने आणि सेवा जागतिक दर्जाच्या बनवण्यासाठी मेहनत घेणे या दृष्टीने मोदी सरकारने टाकलेल्या पावलांना यश मिळत आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याचा ध्यास मोदी सरकारने घेतला आहे. पायाभूत सुविधा क्षेत्रासाठी २० लाख कोटी एवढी मोठी तरतूद मोदी सरकारने २०२४–२०२५ च्या अर्थसंकल्पात केली आहे. राष्ट्रीय महामार्ग, द्रुतगती महामार्ग, टनेल्स, मेट्रो, देशांतर्गत जलमार्ग यातून विकसित भारत आकार घेताना दिसत आहे. देशातील विमानतळांची संख्या गेल्या १० वर्षात दुप्पट झाली आहे. २०१४ मध्ये देशात ७४ कार्यान्वित विमानतळ होते. आता अशा विमानतळांची संख्या १४९ झाली आहे. नवनवीन मार्गावर हवाई सेवा सुरू झाली आहे. गेल्या १० वर्षात ५१७ नवे हवाईमार्ग विकसित झाले आहे.

मोदी सरकारच्या विकासकामांची यादी भली मोठी आहे. विकासकामांची ही गती आणखी वेगाने वाढवण्याचा संकल्प भारतीय जनता पार्टीने केला आहे. २०१४ ते २०२४ या काळात सामान्य भारतीय जनतेने पाहिलेला सर्वात मोठा बदल म्हणजे दहशतवादी कारवायांना घातलेला आळा. २००४ ते २०१४ या काळात मुंबईवरील हल्ल्यासह देशभरात दहशतवाद्यांनी अनेक बॉम्बस्फोट घडवून देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या चिंधड्या उडवल्या होत्या. गेल्या १० वर्षात पंजाब आणि काश्मीर सीमावर्ती भागात झालेल्या तीन घटना वगळता दहशतवादी हल्ल्याची एकही घटना घडली नाही. दहशतवादी हल्ल्याचे अनेक प्रयत्न झाले. मात्र गुप्तचर यंत्रणाच्या सतर्कतेमुळे हे प्रयत्न उधळून लावले गेले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार 'मोदी की गॅरंटी' या शब्द प्रयोगाचा वापर करतात. दहशतवाद निधड्या छातीने मोडून काढण्याची हमी सामान्य भारतीयाने सर्जिकल स्ट्राइक आणि एअर स्ट्राइकच्या रूपाने अनुभवली आहे. यूपीआयसारख्या तंत्रप्रणालीने सामान्य भारतीय माणसाचे जीवन आमुलाग्र बदलले आहे. पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीतून रोजगाराच्या असंख्य संधी उललब्ध होत आहे. स्वयंरोजगाराला आणखी चालना देण्यासाठी मुद्रा योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या कर्जाची मर्यादा १० लाखावरून २० लाख करण्यात आली आहे. एकीकडे भविष्यवेधी नजरेने आणखी तीन वर्षात भारताला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवण्याची हमी तर दुसरीकडे विशिष्ट धर्मियांना देशाच्या कायद्यातून सूट देऊ करणारी तुष्टीकरणाची हमी हा फरक स्पष्ट आहे. ■

# नव्या भारताची दखल जगाला घ्यावीच लागते


पुण्यात अलिकडेच समर्थ युवा फाऊंडेशन आणि युवा स्वराज्य प्रतिष्ठान या संस्थांतर्फे **परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली.** भारतीय जनता पार्टीचे विदेश विभागाचे प्रमुख विजय चौथाईवाले यांनी ही मुलाखत घेतली. या मुलाखतीत श्री. जयशंकर यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे वाढलेले महत्व तसेच विविध क्षेत्रात तरुणांना उपलब्ध होणाऱ्या संधी या विषयावर आपली मते व्यक्त केली. या मुलाखतीत जयशंकर यांनी व्यक्त केलेल्या मनोगताचा संक्षिप्त अंश.



अमेरिकेला भारताबरोबर अनेक क्षेत्रात सहकार्य करण्याची इच्छा आहे.

**मागील** १० वर्षात आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे वेगळे स्थान निर्माण झाले आहे. पूर्वी जागतिक व्यासपीठावर भारताला महत्व नव्हते. आता भारताच्या भूमिकेचे दखल संपूर्ण जगाला घ्यावी लागते आहे. हे एकाएकी घडलेले नाही. भारताची वेगाने होणारी प्रगती पाहून प्रगत देशांना भारताला यापुढे दुर्लक्षून चालणार नाही, हे कळून चुकले आहे. मोदी सरकारने जागतिक पातळीवरील भारताची प्रतिमा बदलवण्यात मोठी भूमिका बजावली आहे. भारताच्या नव्या प्रतिमेमुळेच आपल्यावर कोणी दबाव आणू शकत नाही. चीन, पाकिस्तान या शेजाऱ्यांबाबत 'जशास तसे' असे धोरण स्वीकारल्याने व दहशतवाद सहन न करण्याच्या भूमिकेमुळे (झिरो टॉलरन्स) भारताची प्रतिमा बदलली आहे. चीनबाबत मोदी सरकारने वास्तववादी, व्यव्यहार्य धोरण स्वीकारले. चीनच्या सीमेवर रस्ते, पूल, विमानतळ, रेल्वे, टनेल्स या पायाभूत सुविधा उभारणीसाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला. सीमेवर स्थैर्य, शांतता हवी अशी आपली सुस्पष्ट भूमिका आहे. चीनला आपल्या नव्या भूमिकेची ओळख पटली आहे. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश भारताने २०१६ चा सर्जिकल स्ट्राईक व २०१९ मधील बालाकोट एअर स्ट्राईक या माध्यमातून संपूर्ण जगाला दिला. पूर्वी भारताची प्रतिमा मवाळ अशी होती. आता ही प्रतिमा बदलून आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी सिद्ध झालेला देश अशी भारताची प्रतिमा आहे. अमेरिकेसारखी महासत्ताही भारताबरोबरचे संबंध वाढविण्यास उत्सुक आहे. काही वर्षापूर्वी आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताने चीनला समर्थन दिले होते. त्यामुळे भारताचे अमेरिकेबरोबरचे संबंध बिघडले. त्यावेळी अमेरिकेने पाकिस्तान लष्करी व अन्य सहाय्य देणे सुरू केले. १९५०-१९६० च्या दशकात भारत आणि अमेरिकेदरम्यान चांगले संबंध असते तर आपला देश





**या कार्यक्रमात एस.जयशंकर यांच्याबरोबरचा प्रश्न-उत्तरोचा कार्यक्रमही मोठा रंगतदार झाला. गौरी इथापे या विद्यार्थीनीने, अमेरिकेत पुन्हा ट्रम्प निवडून आल्यास भारताबरोबरच्या संबंधात काय परिणाम होतील, असा प्रश्न विचारला. यावर डॉ.जयशंकर म्हणाले की, नरेंद्र मोदी हे २०१४ मध्ये पहिल्यांदा पंतप्रधान झाले त्यावेळी बराक ओबामा हे अमेरिकेचे अध्यक्ष होते. त्यावेळी आपल्याकडील काही मंडळींनी मोदी यांच्या कार्यकाळात अमेरिकेबरोबरचे संबंध बिघडतील, अशी भीती व्यक्त केली होती. या मंडळींच्या मनात भारत-अमेरिकेचे संबंध चांगले होऊ नयेत, अशी इच्छा होती. या इच्छेतून ही भीती व्यक्त झाली. मात्र प्रत्यक्षात उलटेच घडले. अमेरिकेचे अध्यक्ष प्रथमच भारताच्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याला प्रमुख पाहुणे उपस्थित राहिले. ओबामा यांच्यानंतर डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे अध्यक्ष झाले. त्यावेळी आपल्यातील स्वयंघोषित परराष्ट्रतज्ज्ञ म्हणविणाऱ्या मंडळींनी भारत-अमेरिकेचे संबंध बिघडतील, असे भविष्य वर्तविले होते. मात्र ट्रम्प यांच्या कार्यकाळात भारत-अमेरिकेचे संबंध आणखी दृढ झाले. ट्रम्प यांच्यानंतर जो बायडेन हे अध्यक्ष झाले. ट्रम्प यांचे विरोधक असलेले बायडेन हे अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यामुळे भारत-अमेरिकेचे संबंध बिघडतील अशी भविष्यवाणी याच स्वयंघोषित तज्ज्ञ मंडळींनी उच्चारली होती. यावेळी या मंडळींचे भविष्य खोटे ठरले.**

कुठच्या कुठे गेला असता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेबरोबरच सर्व प्रमुख राष्ट्रांबरोबर चांगले संबंध तयार करण्यावर भर दिला आहे. गेल्या १० वर्षात अमेरिकेने तीन राष्ट्राध्यक्ष पाहिले. या तिन्ही राष्ट्राध्यक्षांच्या कारकिर्दीत भारत-अमेरिका संबंध अधिक घट्ट होत गेले. अमेरिकेला भारताशी सर्वच क्षेत्रात भागिदारी करावयाची आहे. यापुढील काळात भारत आणि अमेरिकेचे संबंध अधिक वृद्धिंगत होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेबरोबरचे संबंध वाढविण्याला प्राधान्य दिले. मोदी सरकारने डिप्लोमेसी आणि आर्थिक धोरणे यांच्या एकत्रिकरणातून अमेरिकेबरोबरचे संबंध सुधारण्यात यश मिळवले. आरोग्य, पर्यटन, दूरध्वनी, तेल या क्षेत्रात अमेरिकेला आपल्याशी सहकार्य करणे भाग पडले. कोरोनाची लस भारतात तयार करण्यासाठी ४० देशातील सप्लाय चैनवर अवलंबून राहावे लागत होते. याकामी अमेरिकेने आपल्याला मोठी मदत केली. कोरोनाच्या संकटकाळात छोट्या-छोट्या देशांना भारताने लस पुरविली. विकसित देशांनी या देशांना लस देण्यास नकार दिला होता. काही देशांनी आधी आमच्या देशातील लसीकरण पूर्ण करतो मग तुम्हाला लस देऊ, असे छोट्या देशांना सांगितले होते. भारताने अशी कोणतीही अट न घालता १०० देशांना लस उपलब्ध करून दिली. त्यामुळे

**या कार्यक्रमावेळी बालगंधर्व तरुण तरुणींच्या गर्दीने फुलून गेले होते. रंगमंदिराची क्षमता संपल्यामुळे अनेकांना बाहेर उभे राहून कार्यक्रम बघावा लागला. बाहेर उभ्या राहिलेल्या तरुण तरुणींसाठी स्क्रीन ची सोया करण्यात आली होती. कार्यक्रमामध्ये तरूण मुला-मुलींना जयशंकर यांच्याबद्दल वाटणारे औत्सुक्य आकर्षण स्पष्ट दिसत होते. नरेंद्र मोदींच्या मंत्रीमंडळात अकार्यक्षमतेला स्थान नाहीच. मात्र एखाद्या केंद्रीय मंत्र्यांची लोकप्रियता एवढी असणे क्वचितच दिसते. कार्यक्रम हा प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात होता. डॉ. विजय चौथाईवाले यांनी सुरूवातीला जयशंकर यांना विचारलेल्या प्रश्नांनंतर प्रेक्षकांकडून विचारलेल्या प्रश्नांना स्थान देण्यात आले. भारतातून शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्यांवर देशातील वंचित विद्यार्थ्यांसाठी काही आर्थिक जबाबदारी टाकावी का, असा एक प्रश्न विचारला गेला. अर्थातच हे अव्यवहार्य आहे. कारण जाणारा स्वत:च्या खर्चाने जातो. मात्र कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या धर्तीवर 'भारत सोशल रिस्पॉनसिबिलिटी' असे काही असावे का हा जोडप्रश्न त्यात होता. यावर परदेशी जाणारे विद्यार्थी वेळ पडेल तेव्हा देशासाठी मोठा आर्थिक भार उचलतात आणि 'भारत सोशल रिस्पॉनसिबिलिटी' याचेच दुसरे नाव देशभक्ती आहे, असे जयशंकर यांनी सांगितल्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला. एका प्रश्नाच्या उत्तरात अमेरिकेत गेल्या दहा वर्षात ३ अध्यक्ष झाले असा उल्लेख करताना जयशंकर म्हणाले,' अब हर किसी को तिसरी टर्म नहीं मिलती'. यावर सभागृह टाळ्या आणि शिट्ट्यांनी दणाणून गेले. तरुणाईचा कल कोणत्या दिशेने आहे हेच यातून दिसले.**

भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमा आमूलाग्र बदलली.

परराष्ट्र धोरणात आपल्या देशाचा फायदा, आपल्या देशाचे हित या दोन गोष्टींना प्राधान्य दिले जाते. प्रगत आणि विकसित देशांबरोबर या दृष्टीकोनातून आत्मविश्वासाने बोलणी केली जातात. मोदी सरकारच्या कार्यकाळातील भारत कुणाच्याही दबाबापुढे झुकत नाही, हा देश आपल्या हिताचे निर्णय घेतो आणि अंमलात आणतो, असा बदल गेल्या दशकात झाला आहे. भारताच्या बदललेल्या भूमिकेतून जगाने योग्य तो बोध घेतला आहे.

गेल्या काही वर्षात भारताची संस्कृती, अभिमानास्पद वारसा याबाबत नागरिकांमध्ये जागृती झाली आहे. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीबाबत पाश्चिमात्य संस्कृतीची उदाहरणे दिली जात होती. आता भारतीय संस्कृतीतील घटनांची उदाहरणे दिली जात आहे. रशिया-युक्रेन यांच्या युद्धकाळात आपण रशियाकडून इंधन खरेदी केली. त्यावेळी रशियाकडून इंधन खरेदी केली नसती तर इंधनाच्या वाढत्या किमतीचा फटका महागाईतील वाढीच्या रूपाने भारतातील सामान्य नागरिकांना बसला असता. असे निर्णय घेण्यासाठी जे धाडस लागते ते मोदी सरकारने वेळोवेळी दाखवले आहे. जगातील विविध देशांमध्ये साडेतीन कोटीहून अधिक भारतीय वास्तव्यास आहे. कोरोनासारखे संकट, युद्ध, हिंसाचाराच्या घटना अशा काळात मोदी सरकारने लाखो भारतीयांना स्वदेशी आणले. मोदी सरकार आपल्या मदतीसाठी काहीही करू शकते, याचा अनुभव विदेशातील भारतीयांनी घेतला आहे.

मोदी सरकारने परराष्ट्र धोरणाबरोबरच उद्योग, तंत्रज्ञान, आघाडीवरही दूरदृष्टी ठेऊन निर्णय घेतल्याने आपली आर्थिक प्रगती वेगाने होत आहे. मोबाईलमधील ५जी तंत्रज्ञान स्वदेशी आहे. ३ जी आणि ४ जी साठी भारत चीनवर अवलंबून होता. मोदी सरकारने देशातील युवकांच्या, विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेवर विश्वास ठेवून त्यांना देशात अधिकाधिक संधी दिली. कमीतकमी सरकारी नियम, सर्व पायाभूत सुविधा असे वातावरण तयार झाल्याने स्टार्टअपची संख्या गेल्या १० वर्षात प्रचंड वेगाने वाढली. भारतातील युवकांना पुढच्या २५-३० वर्षात तंत्रज्ञान क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. जगात 'चीप्स वॉर'सारखी परिस्थिती असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सेमीकन्डक्टर उद्योगांना प्राधान्य दिले आहे.

मोदी सरकाने म्हणूनच अभियांत्रिकी विद्यापीठामार्फत सेमीकन्डक्टर उद्योगाला प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. जगात तंत्रज्ञान आणि पैसे याची उपलब्धता मुबलक आहे. मात्र बुद्धिमान युवक आणि विद्यार्थ्यांची हवी तेवढी उपलब्धता नाही. या पार्श्वभूमीवर भारतीय तरुणांना स्वयंरोजगार, नोकरी अशा दोन्ही क्षेत्रात अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. उक्रेन-रशिया युद्धामुळे भारतात पेट्रोलियम दर भडकणे



ऑपरेशन गंगा




ऑपरेशन कावेरी

जवळजवळ निश्चित होते. अशा परिस्थितीत रशियावर लादलेल्या अमेरिकाप्रणित निर्बंधांमधून मार्ग काढत भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत राहिला आणि या तेलाचे प्रमाण वाढवत राहिला हे विशेष. काही वर्षांपूर्वी अमेरिकेने तेलाचे दर बराच काळ कमी ठेवून रशियाचे अतोनात आर्थिक नुकसान केले होते. तर अशाच राजकारणामधून तेलाचे दर भडकवले जातात, तेव्हा त्यावर अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशाचे अपरिमित नुकसान होते. तेव्हा अमेरिका व योरपीय देशांच्या विरोधाला न जुमानता आणि विशेष म्हणजे त्यांच्याच 'कथनी व करनी'मधला विरोधाभास त्यांना दाखवून सवलतीच्या दरामध्ये रशियाकडून तेल मिळवत राहणे ही एक प्रकारे देशाच्या परराष्ट्रधोरणातील क्रांती म्हणावी असा तो परिस्थितीला अतिशय वेगाने हाताळत घेतलेला अतिशय चेतनामय असा निर्णय होता.

दुसरे उदाहरण होते ते उक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांची सुटका करण्याचे. हा विषय किती संवेदनशील आहे याची अनेकांना कल्पना नसते. याच उक्रेनमध्ये केवढे अराजक चालू आहे याची अनेकांना कल्पना नसते. काही वर्षांपूर्वी स्वत: पंतप्रधानांच्या विमानालाच उक्रेनच्या हवाई हद्दीतून जाताना धोक्याचा इशारा असल्यामुळे मार्ग बदलावा लागला होता. येथे तर प्रत्यक्ष युद्ध चालू झाले होते. अशा परिस्थितीत तात्पुरता युद्धविराम घडवून शक्य तेवढ्या विद्यार्थ्यांना विमानाने उक्रेनबाहेर काढणे हे शक्य तरी होते का, हा मोदी सरकारच्या बढाया मारण्याचा भाग आहे असे मोदीविरोधक म्हणाले होते. त्यांच्यात सकारात्मकतेचा थोडाही अंश उरलेला नाही हे यावरून ठळकपणे दिसले. तिकडे उत्तराखंडमधील अशी सुटका झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी उत्स्फूर्तपणे पंतप्रधाननिधीला देणगी दिल्याची बातमी आपण वाचलेली असते. वास्तविक



ऑपरेशन अजय

अशी सुटका करताना कोणाचे पालक मोदी सरकारवर बिनडोक टीका करतात की कोण मोदीसमर्थक आहेत, अशी चिकित्सा न करता केलेल्या या कार्याचे सर्वांकडून अपेक्षित होते. दुर्दैवाने तसे घडले नाही. वास्तविक अनेक पाश्चिमात्य देश अशा परिस्थितीमध्ये आपल्या नागरिकांना वाऱ्यावर सोडतात आणि भारत मात्र स्वत:च्या नागरिकांसाठीच नव्हे; तर शक्य तेवढ्या अन्य देशांच्या विद्यार्थ्यांना मदत करतो. समस्त भारतीयांच्या दृष्टीने हे अभिमानास्पद आहे.

अतिशय महत्त्वाचे उदाहरण होते ते कोविडकाळातील लसउत्पादनाचे. सीरम या भारतीय कंपनीने यातील मोठा वाटा उचलला असला तरी कमीत कमी वेळात लसउत्पादन करणे त्यांना शक्य व्हावे याकरता त्यांना तब्बल चाळीस देशांमधून विविध सामग्रीची गरज होती. एकीकडे याबाबतीत आपली मक्तेदारी निर्माण करू पाहणाऱ्या अमेरिकेचे याबाबत मन वळवून त्यांचे यात सहकार्य मिळवणे यासारख्या गोष्टीतील यशाची नोंद घेणारे कोण असते! तर ते या सरकारने प्रत्यक्षात घडवून आणले आणि केवळ भारतीयांनाच नव्हे तर याबाबतीत शब्दश: हतबल असलेल्या देशांना मदत करणे, हा संपूर्ण मानवतेच्या इतिहासातील फार मोठा प्रसंग होता. ■

# मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणाचे मूल्यांकन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय परराष्ट्र धोरणाकडे दुर्लक्ष करणे, त्याला बगल देणे मोठमोठ्या जागतिक नेत्यांनासुद्धा परवडणारे नाही. देश-विदेशातील विविध मंचांवरून भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधांवर अनेक सार्वजनिक चर्चा झडत असतात. पण बारकाईने त्यांचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की भूतकाळात अमलात आणल्या गेलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय संबंधविषयक धोरणांच्या चौकटीतूनच नव्या धोरणांकडे पाहायचा शिरस्ता अजूनही अनेक प्रसार माध्यमांकडून होत आहे.

**गेल्या** १० वर्षांत निर्माण केलेले नव्या स्वरुपातले भारतीय परराष्ट्र धोरण आणि त्यावरील विविध माध्यमे करत असलेले त्याचे विवेचन यांच्यातील अंतर किंवा फरक कमी करण्यास परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचे नवीन पुस्तक मदत करेल. एखाद्या देशाच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप घडवणारा, त्याला दिशा देणारा, ती धोरणे प्रत्यक्षात राबविणारा परराष्ट्रमंत्री स्वतःच आपल्या कार्यपद्धतीवर पुस्तक लिहितो असे सहसा घडत नाही. त्यामुळेच हे पुस्तक एक विशेष उपलब्धी ठरते. पुस्तक लिहिण्याचे कारण मांडताना जयशंकर असा युक्तिवाद करतात की जगभरातील बुद्धिजीवी समुदाय आणि राजकीय वर्गाने मोदीकाळात भारताच्या परराष्ट्र धोरणात घडलेले आमूलाग्र बदल नीटपणे समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. त्यामुळे, विद्यमान परराष्ट्र मंत्र्यांना, स्वतः ही जबाबदारी घ्यावी लागली. अत्यंत वेगाने घडणाऱ्या या असामान्य बदलांची ओळख जगाला करून देण्याची म्हणजेच भारत आणि भारताची धोरणांविषयी असणारे पूर्वग्रह निपटून काढून योग्य विचार आणि सत्य जगाला समजावण्याची गरज त्यांना वाटली. लोकांचा दृष्टिकोन घडवण्याचे काम हे पुस्तक करत आहे.

पाकिस्तान, चीन आणि अमेरिकेबरोबर गेली साडेसहा दशके चालत आलेले घिसेपिटे भारतीय परराष्ट्र धोरण हे 'भारताच्या भूतकाळातील राजनैतिक अडचणींच्या स्रोतांचे दुर्मीळ प्रतिबिंब आहे.' पुस्तकात हा मुद्दा प्रामुख्याने मांडण्यात आला आहे. यापैकी बऱ्याच समस्यांवर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय समुदायात अनेक दशके दबक्या आवाजात चर्चा झडत आहेत. परंतु आता जयशंकर यांनी स्वतःच पुढाकार घेऊन, १९५० च्या पुढील ६ दशकांत भारताने केलेल्या निवडींचे, हेतू आणि अनपेक्षित परिणामांचे कठोर मूल्यांकन या पुस्तकाद्वारे करून या दबल्या आवाजांना स्वर मिळवून दिला आहे.

वल्लभभाई पटेल, श्यामा प्रसाद मुखर्जी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मिनू मसानी यांच्यासारखी द्रष्टी समकालीन मंडळी १९५० च्या दशकात नेहरूंची धोरणे, निर्णय व निवडींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत होती. त्यालाच प्रमाण धरून जयशंकरही, जवाहरलाल नेहरूंच्या पाकिस्तान आणि चीनबाबतीतील भोळसटपणा आणि पाश्चिमात्य देशांसंदर्भातील वैचारिक मिंधेपणा यावर पुस्तकात टीका करतात. मात्र 'घटना घडून गेल्या आता टीका करायला मोकळे' अशा स्वरूपाची ही टीका नाही. तर प्रतिष्ठित, अभ्यासू लोकांचा योग्य सल्ला डावलून मुद्दाम घेतलेल्या चुकीच्या निर्णयांवर जयशंकर बोट ठेवत आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात भारताच्या परराष्ट्र धोरणातील चुकांच्या या मूल्यमापनामुळे बरेच वादंग माजणे स्वाभाविक आहे. परंतु यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणाचा दीर्घकालीन आणि प्रस्थापित इतिहास लिखीत

स्वरुपात तयार झाला आहे. भूतकाळात केलेली प्रत्येक गोष्ट त्या वेळकाळ परिस्थितीसाठी योग्य निवड होती, या भ्रमातून बाहेर पडायला भारतीयांना या लेखनामुळे खूप मदत होणार आहे. नेहरूंनी नाकारलेल्या किंवा टाळलेल्या रस्त्यांवरूनच आज भारत कसा मार्गक्रमण करतो आहे याचे जयशंकर यांनी केलेले वर्णन पाकिस्तान, चीन आणि अमेरिकन परराष्ट्र खात्यांना दिल्लीच्या सध्याच्या दृष्टिकोनाबद्दल नीटपणे सजग करते. भारतीय परराष्ट्र धोरणातील घोर चुका, काळा इतिहास जगापासून, प्रामुख्याने भारतीयांपासून पद्धतशीरपणे लपविला गेला. परंतु आता भारतीय परराष्ट्र धोरण विषयात लुडबुड करणाऱ्यांच्या टोळीचे डोळे या पुस्तकामुळे खाडकन उघडले आहेत. कारण आजवर जे काही लपवण्याचा प्रयत्न केला गेला तेच जयशंकर अधोरेखित करून आपल्या लेखनातून, भाषण–संभाषणातून, नीतीद्वारे उच्च स्वरात जगाला सांगत आहेत. भारताच्या परराष्ट्र धोरणातील अनेक आधुनिक, विकासवर्ती बदल आणि नेहरूवादी जागतिक दृष्टिकोनातून निर्णायक सुटका हे मोदीनीतीचे प्रमुख सूत्र आहे. गेल्या दशकातील भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या वर्तनावर इतिहासकार त्यांचे अंतिम म्हणणे मांडतील, तर जयशंकर यांचा त्याच्या उत्क्रांतीचा पहिला हात हा मोदी वर्षांतील भारताच्या आंतरराष्ट्रीय संबंधांवर प्रतिबिंबित करण्याचा प्रारंभबिंदू ठरेल.




भारताच्या परराष्ट्र धोरणाची निश्चित पुनर्रचना १९९१ मध्ये सुरू झाली. भारतातील जुनी आर्थिक व्यवस्था बदलून, आर्थिक जागतिकीकरणाचा उदय झाला. बाकी जागतिक महत्त्वाच्या घटना जसे की सोव्हिएत युनियनचे पतन आणि शीतयुद्धाच्या समाप्तीमुळे भारतासाठी नवीन धोरणात्मक गरजा निर्माण झाल्या. १९९०च्या दशकाच्या सुरुवातीस सुरू झालेल्या आर्थिक सुधारणांमुळे भारताच्या सामर्थ्यामध्ये सातत्याने वाढ झालेली दिसत असूनही दिल्लीला जुनी विचारसरणी त्यागणे शक्य होत नव्हते.

आधीच्या सरकारांनी गृहीत धरलेली गृहितके आणि अडचणी, संकटे, शंका यामुळे तत्कालीन शासनाने जगाच्या बरोबरीने भारताला वाव मिळू दिला नाही. त्यांच्या संकुचित, पूर्वग्रहदूषित धोरणांमुळे, होणाऱ्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय बदलांचे सुपरिणाम मिळवण्यापासून, त्यांचा पुरेपूर लाभ घेण्यापासून भारतीयांना रोखले गेले. परंतु गेल्या दशकात जयशंकर, सुषमा स्वराज आणि पर्यायाने मोदींनी जाणीवपूर्वक आणि धाडसी परराष्ट्र धोरणाचा अवलंब करत, जगाशी व्यवहार करताना भारताचा हा ऐतिहासिक संकोच संपविण्यावर बराच भर दिला आहे. जयशंकर यांचे परराष्ट्र खाते मोदींच्या नेतृत्वाखालील भारताच्या नवीन परराष्ट्र धोरणाच्या काय असावे आणि कसे राबवावेच्या पुढे जाऊन भारताच्या परिवर्तनाच्या का चाही शोध अनेक अंगांनी घेत आहे. मोदींनी आणलेला अतिशय वेगळा जागतिक दृष्टिकोन, आत्मसन्मानाची नवीन भावना आणि भारत प्रथम ठेवणारे परराष्ट्र धोरण पुढे नेण्याचा निर्धार हे केवळ पोकळ शब्द नाहीत तर प्रत्यक्ष कृती आहे याची कित्येक उदाहरणे मोदी व जयशंकर घालून देत आहेत. परराष्ट्र धोरणातील परिवर्तनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे भारताच्या परंपरा आणि संस्कृती खोलवर रुजवणे, तिला नवसंजीवनी मिळवून देणे आणि वस्तविकतेच्या हिऱ्याला परराष्ट्र धोरणात चमक देण्यासाठी एक नवीन बौद्धिक कोंदण तयार करणे हेच तर आहे.

२०२० मध्ये प्रकाशित झालेल्या 'द इंडिया वे' या त्यांच्या पहिल्या पुस्तकात जयशंकर यांनी महाभारताचे दाखले देऊन आपले मुद्दे मांडले तर या नव्या दुसऱ्या पुस्तकात ते रामायणाची कास धरतात. 'विश्वमित्र भारत' या पुस्तकाचे शीर्षकच मोदी सरकारची निःशंकीकरण आणि स्वदेशीकरण या वादग्रस्त वैचारिक वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. जयशंकर यांच्या निष्कर्षाशी सर्वजण सहमत असतीलच असे नाही की भारत महत्त्वाचा आहे कारण तो भारत आहे. परंतु जयशंकर यांच्या पुस्तकातील त्या प्रस्तावावर आणि इतर अनेक अपारंपरिक विषयांवर चर्चा केल्याने भारतीय परराष्ट्र धोरणाच्या चर्चेत एकमत आणि एकमताच्या मोहामुळे दीर्घकाळ गुदमरून गेलेल्या चर्चेला नवसंजीवनी मिळायला हवी.

**मूळ इंग्रजीत परिचय – अमेय कुलकर्णी**

**मराठी अनुवाद – अमिता आपटे**

**(अनुवादक आपटे ह्या सामाजिक कार्यकर्त्या आणि आंतरराष्ट्रीय तसेच ईशान्य भारतातील प्रश्नांच्या अभ्यासक आहेत.)**

# उबाठा, लवकर बरे व्हा



अठराव्या लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यांतील प्रचारात एकमेकांवर शरसंधान करण्याची सत्ताधारी व विरोधी पक्षांत मोठी स्पर्धा सुरू झाली आहे. सरकारच्या निर्णयांवर किंवा योजनांवर टीका करणे हे समजता येईल; पण कोणाला वैयक्तिक नालायक, कोडगा, वेडा, मूर्ख, मनोरुग्ण म्हणून जाहीरपणे हिणवणे हे कितपत योग्य आहे.

**एक** माजी मुख्यमंत्री दुसऱ्या माजी मुख्यमंत्र्यांचा व आजी उपमुख्यमंत्र्यांचा कोडगा नि नालायक अशा शिवराळ भाषेत बोलून पाणउतारा करीत असेल; तर हीच का ती महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा असा प्रश्न पडतो. राजकारणात जय-पराजय होत असतात. सत्ता येते व जाते. पक्ष फुटणे आणि सरकार कोसळणे या घटना घडतच असतात. कोण केव्हा कोणाच्या प्रलोभनाला बळी पडेल याची शाश्वती नसते. पण सत्ता संघर्षाच्या काळात व निवडणुकीच्या राजकारणात डोक्यावर बर्फाचा खडा आणि तोंडात खडीसाखर ठेवणारे फारच थोडे भेटतात. आपली सत्ता गेल्यानंतर उद्धव ठाकरे यांचा तोल सुटला आहे असे वाटू लागले आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे कधीच सत्तेच्या परिघात नव्हते. ते केंद्रातही मंत्री झाले असते आणि राज्यातही मुख्यमंत्री होऊ शकले असते; पण त्यांनी सामान्य शिवसैनिकांना सत्तेवर बसवले. त्यांनी जाहीर सभांमध्ये विरोधकांचे विशेषत: काँग्रेसचे अनेकदा वाभाडे काढले. संवेदनशील प्रश्नावर बोटचेपे धोरण स्वीकारणाऱ्या नेत्यांचे त्यांनी अनेकदा वस्त्रहरण केले. पण त्यामागे सत्तेचा माज नव्हता किंवा अहंकार कधी दिसला नाही. व्यासपीठावरून उतरल्यावर शिवसेनाप्रमुख अगदी साधे असायचे. सर्वांमध्ये मिसळायचे. हास्यविनोद करायचे. आपल्या मिष्किल कोट्यांनी धमाल उडवून द्यायचे. म्हणूनच अन्य पक्षांतील विरोधकांनाही त्यांचे आकर्षण होते. सर्वच पक्षात त्यांचा आदर केला जायचा. मग उद्धव ठाकरे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एवढे का घसरले आहेत? देशपातळीवर भाजपाचे अन्य नेते रोज काँग्रेस पक्षाची कुंडली बाहेर काढत आहेत. भ्रष्टाचार व घराणेशाहींवरून काँग्रेस पक्षाला रोज झोडपून काढत आहेत. महाराष्ट्रात मात्र उद्धव ठाकरे हे आपला पक्ष फोडल्याचे खापर सतत देवेंद्र फडणवीस यांच्यावर फोडत आहेत. राज्यात काँग्रेस हा भाजपाशी लढायला सक्षम आहे असे दिसत नाही. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस काही मोजक्या जागांवर आपले अस्तित्व टिकविण्यासाठी झगडत आहे. अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस तर भाजपाच्या वळचणीला येऊन सत्तेत बसली आहे. उद्धव ठाकरे रोज मोदी-शहा आणि फडणवीस यांच्यावर एक से एक भन्नाट आरोप करून मीडियाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या भाषणात ठाकरे यांचे नाव न घेता डुप्लिकेट शिवसेना अशी खिल्ली उडवताच उद्धव यांना त्याचा राग आला, त्यांनी लगेचच मोदींची डिग्री नकली असल्याची टीका केली. निवडणूक प्रचारात उद्धव ठाकरे आपल्या भाषणातून मोदी, शहा आणि फडणवीस यांना सातत्याने आपल्या अंगावर घेत आहेत. या तिघांना त्यांनी आपल्या हल्ल्याचे टार्गेट बनवले आहे. मोदी-शहांवर टीका केली की देशभर त्याला प्रसिद्धी मिळते हे त्यांना ठाऊक असावे. पश्चिम बंगालमधून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या सुद्धा मोदी-शहांवर थेट हल्लाबोल करीत असतात; पण ममता व उद्धव यांच्यात मोठा फरक आहे. ममता यांनी स्वबळावर मुख्यमंत्रीपदाची हॅटट्रीक केली आहे. त्यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाने मार्क्सवादी कम्युनिस्ट व काँग्रेस पक्षाला जवळपास संपवले आहे. त्यांच्याकडे सत्ता व राज्यभर पक्ष संघटना मजबूत आहे. उद्धव ठाकरे यांना एकनाथ शिंदे यांनी केलेल्या उठावानंतर अडीच वर्षांत सत्ता गमवावी लागली.

मुख्यमंत्रीपद तर गेलेच; पण पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह गमवावे लागले. मशाल चिन्ह घेऊन पक्ष वाचविणे हे सर्वात महत्त्वाचे आव्हान उद्धव यांच्यापुढे असताना ते मोदी, शहा व देवेंद्र यांच्यावर असभ्य भाषेत का टीका करीत आहेत?

मातोश्रीवरील शिवसेनाप्रमुखांच्या खोलीत अमित शहा यांनी मला अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाचे वचन दिले होते, असे सांगून काही दिवस उद्धव ठाकरे यांनी धुरळा उडवला. अमित शहा यांनी त्याचा साफ इन्कार केला तरी भाषणात व मुलाखतीत बाळासाहेबांची ती खोली म्हणजे आपल्याला ते पवित्र मंदिर असल्याचे सांगून मतदारांची सहानुभूती मिळविण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी आपले चिरंजीव आदित्य यांना मुख्यमंत्रीपदासाठी तयार करतो, अडीच वर्षांनंतर ते मुख्यमंत्री होतील व आपण दिल्लीला जातो असे म्हटले होते, असे उद्धव आता सांगत आहेत. २०१९ च्या निवडणूक प्रचारात शिवसेना-भाजपामध्ये प्रत्येकी अडीच वर्षे मुख्यमंत्रीपदाचा समझोता झालाय, असे त्यांनी कधीच जाहीरपणे म्हटले नव्हते. तसेच गेल्या साडेचार वर्षांत देवेंद्रजी यांनी आदित्यला मुख्यमंत्रीपदासाठी तयार करतो असे म्हटल्याचेही कधी सांगितले नव्हते. लोकसभा निवडणुकीच्या काळात आपण नवीन गौप्यस्फोट करीत आहोत, असा उद्धव यांनी आव आणला असला तरी त्यावर सामान्य माणूस कसा विश्वास ठेवेल?

शिवसेनाप्रमुखांनी शिवतीर्थावर केलेल्या दसरा मेळाव्यातील शेवटच्या भाषणात उद्धव व आदित्यला सांभाळा, असे भावनिक आवाहन शिवसैनिकांना केले होते. उद्धव यांनी शिवसैनिकाला राज्याचा मुख्यमंत्री करणार असा शब्द शिवसेनाप्रमुखांना दिला होता; पण उद्धव स्वत: मुख्यमंत्री होतील किंवा आदित्य त्यांच्या सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री होतील, असे कुणाला स्वप्नातही वाटले नव्हते. मुख्यमंत्रीपदासाठी त्यांनी भाजपाशी युती तोडून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी केली. १०५ आमदार असलेल्या भाजपाला मुख्यमंत्रीपद न देता, ५४ आमदारांच्या पक्षाचा प्रमुख स्वत:च मुख्यमंत्री झाला. त्यातून जनतेत चुकीचा संदेश जातोय, याचेही भान ठेवले नाही. शिवसेनाप्रमुख हे किंगमेकर होते; पण पक्षप्रमुख हे स्वत:च किंग झाले. तेही काँग्रेस-राष्ट्रवादीच्या साथीने. याचीच खदखद पक्षात वाढत गेली.

आदित्यला मुख्यमंत्री म्हणून मी तयार करतो आणि मी दिल्लीला जातो, असे देवेंद्र फडणवीस हे उद्धव यांना आश्वासन देतात यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. देवेंद्र ज्या पक्षात आहेत, त्या पक्षाचे सर्व निर्णय दिल्लीतील श्रेष्ठी घेत असतात. भाजपाबरोबर एकनाथ शिंदे गट आल्यानंतर देवेंद्रच मुख्यमंत्री होतील, असे सर्वांना शंभर टक्के वाटले होते; पण शिंदे यांनी दाखवलेल्या धाडसाची किंमत म्हणून भाजपाने त्यांना मुख्यमंत्रीपद दिले. राज्याचे नेतृत्व कोणी करावे हे हायकमांड ठरवते, मग आदित्यला आपण मुख्यमंत्री म्हणून तयार करतो असे देवेंद्रजी कसे सांगू शकतील? यावर्षी अयोध्येला रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमालाही उद्धव ठाकरे हजर राहिले नाहीत, त्याचे कारण त्यांनी जाहीर केले नाही. ते मुख्यमंत्री असताना नवनीत राणा यांना जेलमध्ये पाठवले गेले. कारण काय तर हनुमान चालिसा पठण करणार असे त्यांनी जाहीर केले होते. महाविकास आघाडी सरकारमध्ये ठाकरे कुटुंबीयांचा कसा सर्वत्र हस्तक्षेप होता हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जाहीरपणे सांगत आहेत. त्यावर ठाकरे मौन पाळून आहेत. शिंदे हे नगरविकास मंत्री असताना त्यांच्या खात्यात व महापालिकेच्या कारभारात आदित्य रस घेत असे हे जगजाहीर होते. रस्ते विकास महामंडळाच्या बैठकाही आदित्य बोलवत असत. अडीच वर्षांच्या कालावधीत मुख्यमंत्री म्हणून ठाकरे हे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या मंत्रालयात केवळ दोन वेळा गेले असतील, त्यांच्या कारभाराबाबत काय बोलावे?

आमचे मित्र उद्धव ठाकरे हे थोडे भ्रमिष्ट झाले आहेत, त्यांना वेड लागले आहे, मला नाही, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. उद्धव यांनी देवेंद्र यांना नालायक, कोडगे म्हणून संबोधले; पण त्यांच्या टीकेला जशास तसे उत्तर देण्यात येईल, असे देवेंद्र यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे हे देवेंद्र यांना नालायक म्हणाले. महाराष्ट्रातील जनता त्यांना माफ करणार नाही. गेल्या वेळी मोदींचे फोटो लावून १८ खासदार निवडून आणले. आता मोदींचा फोटो नाही, उबाठा सेनेचे दोन-चार सुद्धा निवडून येणार नाहीत, असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुनावले आहे. आजवर एकच वाघ होऊन गेला, तो म्हणजे बाळासाहेब ठाकरे. मी रिंग मास्टर असल्याने वाघाचे कातडे पांघरलेल्या शेळ्या ओळखतो, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला आहे. ■

# गोरगरिबांची संपत्ती लुबाडण्याचा काँग्रेसचा कट

> देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या उत्पन्नात भरीव वाढ घडवून आणून देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यावर भारतीय जनता पक्षाच्या सरकारचा भर आहे. याउलट काँग्रेसने कायम सर्व नागरिकांचे उत्पन्न वाढविण्याऐवजी अधिक उत्पन्न असणाऱ्यांकडून सक्तीने त्याचा काही भाग वसूल करून कमी उत्पन्न असणाऱ्यांमध्ये वाटून टाकण्याच्या घातक धोरणांचा आग्रह धरलेला आहे. ताज्या जाहीरनाम्यातही काँग्रेसने तीच घातक धोरणे पुढे चालविण्याचे ठरविलेले दिसते आहे.

**पक्षाचा** जाहीरनामा प्रकाशित करताना ५ एप्रिल रोजी राहुल गांधी म्हणाले की, भारतात ९० टक्के लोकसंख्या इतर मागासवर्गीय, दलित, आदीवासी अल्पसंख्य आणि गरीब सर्वसाधारण वर्गांची असली तरी, भारतातल्या सरकारी संस्था व मोठमोठ्या कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांमध्ये त्यांचे हे प्रमाण दिसत नाही. त्यामुळे काँग्रेस जातनिहाय जनगणना करून वस्तुस्थिती जाणून घेईल आणि त्यानंतर वित्तीय व संस्थात्मक सर्वेक्षण करून भारताची संपत्ती कोणत्या वर्गाच्या हाती आहे हे लक्षात घेऊन संपत्तीच्या फेरवाटपाचे क्रांतिकारक काम सुरू करू. हीच बाब त्यांनी १६ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्रात आणि त्याआधी तेलंगाणातील प्रचारसभेतही सांगितली होती. म्हणजेच काँग्रेस एससी, एसटी, महिला यांसारख्या गरीब व उपेक्षितांची बचत हिरावून घेऊन तिचे अल्पसंख्यकांमध्ये फेरवितरण करू इच्छिते, हे यावरून स्पष्ट होते,



सर्वसामान्यांच्या उत्पन्नावर डल्ला मारण्याचे काँग्रेसचे हे धोरण जुनेच असून जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधी यांच्या नेतृत्त्वाखालील काँग्रेस सरकारांनी कम्पल्सरी डिपॉझिट स्कीम ॲक्ट या नावाने ओळखले जाणारे कायदे साठ आणि सत्तरच्या दशकात आणले होते, ज्या अन्वये सर्व करदाते, सरकारी कर्मचारी आणि संपत्ती धारकांना आपल्या कमाईपैकी १८ टक्के हिस्सा सरकारकडे जमा करावा लागत असे. ही जमा झालेली संपत्ती ३ ते ५ वर्षे सरकारी खजीन्यात राहात असे. हा निधी ज्याचा त्यांना परत करण्याबाबतचे सर्वाधिकार सरकारच्या हाती होते. महत्त्वाची बाब ही आहे, की १९७४ मध्ये हा कायदा आणला गेला तेव्हा माजी पंतप्रधान मनमोहन सिंह सरकारचे प्रमुख आर्थिक सल्लागार होते. त्यांनीच २००६ साली पंतप्रधान असताना मुसलमानांचा या देशाच्या संसाधनांवर पहिला हक्क आहे, असे म्हटले होते. काँग्रेसची सारी धोरणे अशाप्रकारे माओवादी आणि साम्यवादी अजेंडा राबविणारी दिसतात.

देशाची सामाजिक घडी पूर्णपणे मोडून केवळ अल्पसंख्यांक मुस्लिमांच्या लांगूलचालनाचे राजकारण करण्याचे घातक राजकारण उघडे पडल्यामुळे आता काँग्रेस हादरून गेली असून, संपत्तीचे फेरवाटप करण्याचा माओवादी कट काँग्रेसने रचल्यामुळे सावध राहणे गरजेचे आहे. देशातील साधनसंपत्तीवर पहिला अधिकार अल्पसंख्यांकांचा, म्हणजे मुस्लिमांचा आहे असा दावा २००६ मध्येच तेव्हाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांनी केला होता. आता काँग्रेस सत्तेवर आल्यास तो प्रत्यक्षात

आणला जाईल आणि गरीबांकडील संपत्ती हिरावून घेतली जाईल. राजस्थानमधील बसवारा येथील जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी काँग्रेसचा हा कट उघड केल्यामुळे काँग्रेस आता भयभीत झाली असून त्यांनी थटथयाट सुरू केला आहे. मात्र, काँग्रेसच्या तुष्टीकरणाच्या राजकारणामुळेच देशातील दलित, मागासवर्गीय, ओबीसी समाज विकासापासून वंचित राहिला असून केवळ अल्पसंख्याकांची मते मिळविण्यासाठी काँग्रेसने या समाजाची कायम उपेक्षा केली आहे. याउलट, देशाच्या विकासाची फळे समाजाच्या प्रत्येक स्तरावरील अखेरच्या व्यक्तिपर्यंत पोहोचली पाहिजेत, सरकारच्या प्रत्येक योजनेचा संपूर्ण लाभ खऱ्या लाभार्थीला मिळाला पाहिजे आणि प्रत्येक कुटुंबाला सक्षमतेच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत, यावर मोदी सरकारने नेहमीच भर दिला आहे. अंत्योदयाच्या संकल्पनेवर भारतीय जनता पार्टीची श्रद्धा असून अंत्योदयाच्या नीतीवरच पक्षाची वाटचाल सुरू असल्याने मोदी सरकारने गेल्या दहा वर्षांत आखलेल्या प्रत्येक योजनेचे लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले आहेत. गरीबांच्याही संपत्तीवर डोळा असलेली व संपत्ती काढून घेऊन अन्य समाजात तिचे वाटप करण्याचा कट आखणारी काँग्रेस व प्रत्येक समाजघटकास संपत्ती निर्माण करण्याच्या संधी देणारी भाजप असा हा सामना आहे. मुस्लिमांचे लांगूलचालन करून निवडणुका जिंकण्याचे काँग्रेसचे राजकारण १९६० च्या दशकापासून सुरू आहे, आणि भाजप सातत्याने याविरुद्ध संघर्ष करत आहे. एका बाजूला तुष्टीकरणाचे राजकारण आणि दुसरीकडे मोदी सरकारचे विकासाचे राजकारण यांतील या संघर्षात देशातील जनतेने कायमच विकासाच्या राजकारणास साथ दिल्यामुळेच प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसची सातत्याने हार होत असल्याने आता जनतेच्या संपत्तीवर काँग्रेसचा डोळा आहे. लोकांकडील अतिरिक्त संपत्ती काढून घेण्याची ही मूळ विचारसरणी माओवादी-नक्षलवाद्यांची असून काँग्रेस आता ती प्रत्यक्षात आणू पाहात आहे.

काँग्रेसच्या २०२४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात असे स्पष्टपणे नमूद आहे की, देशातील जाती, उपजातींच्या सामाजिक, आर्थिक स्थितीची गणना करण्यासाठी देशव्यापी कार्यक्रम राबविला जाणार असून त्यातून मिळणाऱ्या माहितीच्या आधारावर पुढील कार्यवाहीची दिशा मजबूत केली जाईल, असे काँग्रेसच्या २०२४ च्या निवडणूक जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले गेले आहे. या देशात बहुसंख्यवादाला थारा नाही, असेही काँग्रेसने म्हटले असून अल्पसंख्यांकांना आर्थिक मदत, शैक्षणिक लाभ, सार्वजनिक रोजगार, कौशल्य विकास, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात अधिक संधी देण्याची हमी काँग्रेसने दिली आहे. मागासवर्गीय जातीजमातींसाठी असलेल्या आरक्षणाच्या ५०टक्के मर्यादा हटवून ती वाढविली जाईल. अल्पसंख्यांकांना अधिकाधिक लाभ मिळविण्याचीच ही योजना असून संपत्ती व उत्पन्नातील असमानता दूर करण्याच्या काँग्रेसच्या आश्वासनामुळे देखील अतिरिक्त संपत्तीधारकांची संपत्ती अल्पसंख्याकांकडे वळविण्याचा छुपा हेतू उघड झाला आहे. नागरिकांचे व संस्थांचे वित्तीय सर्वेक्षण करण्याचा व देशातील संपत्तीचे स्रोत शोधण्याचा काँग्रेसचा इरादा राहुल गांधी यांनी ५ एप्रिल रोजी जाहीरनामा जारी करतानाच उघड केला होता. मात्र,त्याचे कथानक फार पूर्वीच लिहिले गेले आहे. कोणाकडे किती संपत्ती आहे हे शोधून काढण्याची मोहीम हाती घेण्याचे १६ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्रात बोलतानाही राहुल गांधी यांनी जाहीर केले होते, तर ६ एप्रिल २०२४ रोजी तेलंगणात बोलताना, 'जिसकी जितनी आबादी, उतना उसका हक' असे जाहीर करून त्यांनी संपत्तीच्या वितरणाचा कट उघडही केला आहे. गरीब, मागासवर्गीयांची कमाई, महिलांची बचत काढून घेऊन त्यातील मोठा वाटा अल्पसंख्याकांच्या ताटात घालण्याचा काँग्रेसचा इरादा यातूनच स्पष्ट झाला आहे. याआधी, १९६३ व १९७४ मध्ये जवाहरलाल नेहरू व इंदिरा गांधी यांच्या सरकारने केलेल्या कायद्यामुळे आपल्या कमाईचा १८ टक्के हिस्सा सरकारजमा करणे सरकारी कर्मचारी व संपत्तीधारकांना भाग पडत होते. अनुसूचित जातींच्या यादीत मुस्लिमांचा समावेश करणे, सरकारी नोकऱ्यांत मुस्लिमांना १५ टक्के आरक्षण ठेवणे, धर्माच्या नावाखाली ओबीसी आरक्षणाचे विभाजन करून मुस्लिमांकरिता सहा टक्के रक्षण ठेवणे व धर्मांतरानंतरही अनुसूचित जातींचा दर्जा कायम ठेवणे असे अनेक प्रयत्न काँग्रेसकडून सुरू होते. डॉ. मनमोहन सिंह यांच्या या वक्तव्याच्या काही दिवस अगोदर सच्चर समितीचा अहवाल आला आणि मुस्लिमांची स्थिती दलितांहूनही बिकट असल्याचा दावा त्यामध्ये केला गेला, हा काही निव्वळ योगायोग म्हणता येत नाही. यातून काँग्रेसचा खरा चेहरा उघड झाला आहे. ■

# गोरगरिबांच्या पोटावर पाय आणणारी काँग्रेस

> काँग्रेसच्या जाहीरनाम्यात अल्पसंख्यांक समाजाच्या तृष्टीकरणासाठी अनेक आश्वासने देण्यात आली आहे. त्याही पुढे जाऊन काँग्रेस धर्माच्या आधारावर देशाचे विभाजन करू इच्छित असल्याचे दिसते आहे. 'काँग्रेस सत्तेवर आल्यास देशातील नागरिकांच्या संपत्तीवर वारसा कर लावू,' असे काँग्रेसचे नेते सॅम पित्रोदा यांनी अलिकडेच जाहीर केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारी बँकांमध्ये गोरगरिबांची, कष्टकरी वंचितांची ५४ कोटी खाती उघडून या वर्गाला अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणले.

**काँग्रेसला** या गोरगरिबांच्या पैशावरही कर लावायचा आहे. या जन-धन खात्यामध्ये सरकारी योजनांचे अनुदान, अर्थसहाय्य मिळून आजवर २ लाख कोटी रुपये पाठवले आहेत. काँग्रेसला गोरगरिबांच्या जन-धन खात्यातील पैशावरही कर लावायचा आहे. काँग्रेस नेतृत्वाचा खरा चेहरा यातून देशासमोर आला आहे. काँग्रेस नेतृत्वाने याला संपत्तीची फेरवाटणी असे नाव दिले आहे. आम्ही सत्तेवर आल्यावर देशातील नागरिकांच्या आर्थिक स्थितीची पाहणी करून त्यानुसार संपत्तीचे फेरवाटप करू, असे काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी जाहीरसभेत सांगितले आहे. गोरगरीब, मध्यमवर्गीय माणसाकडेही कौटुंबिक वारश्यातून रोख रक्कम, स्थावर मालमत्ता, दाग-दागिने आलेले असतात. शेतजमीन, घर हेही वाढवडिलांकडून मिळालेले असते. अशा संपत्तीवर काँग्रेसचा डोळा आहे, असे दिसते आहे. राहुल गांधींच्या जाहीर सभेतील वक्तव्यानंतर सॅम पित्रोदा यांनी वारसा कराबाबत सूतोवाच केले. भारतीय समाज व्यवस्थेचा पाया परंपरागत संपत्ती, मालमत्तेवर आधारीत आहे. भारतीय अर्थव्यवस्था सामान्य नागरिकांकडून केल्या जाणाऱ्या बचतीवर वाढलेली आहे. जगातील नामवंत अर्थतज्ज्ञही भारतीय नागरिकांच्या बचत करण्याच्या सवयीबद्दल कौतुकाने बोलत असतात. प्रत्येक पिढी कष्टाने संपत्ती जमा करते, या संपत्तीतील काही भाग आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी बाजूला काढून ठेवते. पुढच्या पिढ्याही आपल्या वारसांसाठी आपल्या कमाईतील काही न काही भाग बाजूला काढून ठेवतात. एक पिढी कष्ट करते, त्या पिढीने कमवलेल्या संपत्तीचा वाटा मिळाल्याने तिसरी पिढी सुखात, आरामात राहते, असे चित्र आपल्याला भारतात आढळून येते. वडिलोपार्जित संपत्तीमध्ये कुणाला घर, बंगला, शेतजमीन, दाग-दागिने, बँकातील ठेवी मिळतात. तर कुणाला शेअर्समधील गुंतवणूक, प्लॉट आदी स्थावर मालमत्तेत केलेली गुंतवणूक मिळते. काही देशांमध्ये वारश्याने मिळालेल्या संपत्तीवर, मालमत्तेवर कर लावला जातो, असा दाखला देत सॅम पित्रोदा यांनी भारतातही याच पद्धतीचा वारसा कर लागू करण्याची कल्पना मांडली आहे.

जगामध्ये सोन्याची सर्वाधिक खरेदी भारतात होते. भारतात दरवर्षी सरासरी ७०० टन एवढे सोने खरेदी केले जाते. भारतातल्या गरिबातला गरीब माणूस आपल्या कमाईतील हिस्सा बाजूला काढून सोने खरेदी करतो. सोन्याची खरेदी बचत म्हणूनच केली जाते. बचत म्हणून खरेदी केलेल्या सोन्यातूनच पुढील पिढीतील लेकी-सुनांना मंगळसूत्रासारखे दागिने मिळतात. काँग्रेसला या बचतीवर ४५ टक्के कर लावायचा आहे. भारतीय अर्थव्यस्थेचा आधार असलेल्या बचतीवरच काँग्रेसला घाला घालायचा आहे. अत्यंत भयानक आणि विनाशकारी कल्पना मांडून काँग्रेसने आपल्याला सामान्य भारतीयांचे भले करायचे नाही, हेच सिद्ध केले आहे. सर्वसामान्य




नागरिकाच्या वार्षिक उत्पन्नावर त्याला आयकर भरावा लागतो. मात्र काँग्रेसला कुटुंबाच्या परंपरेतून, वडिलोपार्जित मालमत्तेतून मिळालेल्या पैशा-अडक्यावर, दागिन्यांवर, घर-जमीनीवर कर लावायचा आहे. कष्टकरी, गोरगरीब, वंचितांना सुखाने जगता येऊ नये, अशीच काँग्रेसची इच्छा दिसते आहे. एकेकाळी गोरगरिबांना बँका कर्ज देत नव्हत्या म्हणून इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. यातून गरिबांचे फारसे भले झालेच नाही, ही गोष्ट वेगळी. मात्र याच इंदिरा गांधींच्या नातवाला आणि सुनेला सामान्य भारतीयाच्या बँकेतील दाग-दागिन्यांवर, घर, जमिनीवर कर लावायचा आहे. या करातून भारतात घुसखोरी केलेल्या रोहिंग्या मुस्लिम यासारख्या लोकांना काँग्रेसला पोसायचे आहे. कारण भारतातील मुस्लिमांना वडिलोपार्जित संपत्तीमधून काही न काही मिळालेच आहे. भारतात जे कोट्यवधी घुसखोर आलेले आहेत ते आपल्याला वडिलोपार्जित मालमत्तेमधून काही मिळाले आहे, हे दाखवू शकणार नाहीत. अशांना काँग्रेस सामान्य भारतीयांच्या बचतीवर डल्ला मारून संपत्ती वाटप करायचे आहे. काँग्रेसची संपत्तीच्या फेरवाटपाची कल्पना अशी आहे. गोरगरिबांचे आपल्या मालकीच्या घराचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान आवास योजनेमुळे पूर्ण झाले आहे. या योजनेत ४ कोटीहून अधिक गोरगरिबांना, कष्टकऱ्यांना, वंचितांना घरे मिळाली आहेत. पुढच्या ५ वर्षात आणखी ३ कोटी गरिबांना घरे देण्याचा संकल्प मोदी सरकारने सोडला आहे. या गोरगरिबांना आपल्या मुला-बाळांच्याच नावे घर करायचे असते. मोठ्या कष्टाने बांधलेल्या पंतप्रधान आवास योजनेतील घरांवरही काँग्रेसला कर लादायचा आहे. एका अर्थाने काँग्रेसला सामान्य भारतीयांची संपत्ती लुटायची आहे. देशाच्या साधनसंपत्तीवर मुस्लिमांचा प्रथम हक्क आहे, असे डॉ.मनमोहन सिंग यांनी २००६ मध्ये पंतप्रधान असताना म्हटले होते. मनमोहन सिंग यांना जे म्हणायचे होते तेच आता संपत्तीच्या फेरवाटपाद्वारे राहुल गांधींना साध्य करायचे आहे. काँग्रेसच्या सत्ता काळात वक्फ बोर्डांना सरकारकडून भरपूर निधी दिला गेला. याखेरिज या बोर्डांवर सरकारी जमिनींची खैरातही करण्यात आली. वर्षानुवर्षे सरकारची मेहरबानी राहिल्यामुळे या वक्फ बोर्डांकडे गडगंज संपत्ती जमा झाली आहे. अशा संस्थांवर कर लावाण्याची इच्छा काँग्रेसला होत नाही. मात्र सर्वसामान्य, गोरगरिबांच्या परंपरेने मिळालेल्या मालमत्तेवर मात्र काँग्रेसला कर लावायचा आहे. अनेक वर्षे सत्तेत राहूनही काँग्रेसला गोरगरिबांचे भले करता आले नाही. मात्र वारसा कर लादून गरिबांना रस्त्यावर आणण्याची काँग्रेसची इच्छा असल्याचे लपून राहिले नाही. मतदारांचा एकूण कल लक्षात आल्यामुळे मोदी सरकार विरोधात प्रचार करण्यासाठी मुद्दाच शिल्लक राहिला नसल्याने मतदारांचे ध्रुवीकरण करण्याच्या उद्देशाने अशा पद्धतीच्या कल्पना काँग्रेस नेतृत्व मांडू लागले आहे. अल्पसंख्यकांच्या एकगठ्ठा मतांवर डोळा ठेवून हा खेळ खेळला जात आहे.

खाजगी, असंघटीत क्षेत्रातील कामगार वर्ग आपल्या निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी आपल्या उत्पन्नातून काहीना काही भाग बाजूला काढत असतो. आयुष्यभर कष्ट करून साठवलेली पै न पै बँक ठेवी किंवा अन्य मार्गात गुंतवून त्या आधारावर निवृत्तीनंतरचे आयुष्य जगणारे कोट्यवधी भारतीय आहेत. या कष्टकऱ्यांनी आपले निवृत्तीनंतरचे आयुष्य सुखकर व्हावे यासाठी जमवलेली पुंजीही काँग्रेसला पाहावेनासी झाली आहे. विदेशातील स्थिती आणि भारतातील स्थिती यात फरक आहे, हे काँग्रेसच्या अकलेच्या कांद्यांनी लक्षात घेतलेले नाही. त्यामुळेच अशा गोरगरिबांच्या पोटावर पाय आणणाऱ्या कल्पना काँग्रेसला सुचू शकतात. ■



**सोलापूर** येथील विडी घरकुलमध्ये महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ यांनी महिलांशी संवाद साधला.




**सांगली- उपस्थिती-** 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' प्रदेश संयोजिका डॉ. शुभा फरांदे-पाध्ये, जिल्हा संयोजिका स्वाती शिंदे, शहर उपाध्यक्षा अनिता वनखंडे, जिल्हा उपाध्यक्ष माधुरी वसगडेकर, गीताजंली डोपे-पाटील, शांता जाधव, अस्मिता सरगर, जयश्री कुरणे, नुतन कुमार आदी.



**रत्नागिरी- उपस्थिती-** महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा वर्षा भोसले, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सुजाता चिटणीस, प्रदेश सचिव शिल्पा मराठे, उपाध्यक्षा वर्षा निंबाळकर, महिला अध्यक्ष सुयोग जठार, नवी मुंबई जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्षा मनिषा वाघ, नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस देविका मिश्रा, विधानसभा विस्तारक योगेश मुळे आदी.



**अहमदनगर- उपस्थिती-** पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, महानगराध्यक्ष अभय आगरकर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, आदी.

# नमो संवाद, प्रचार फेऱ्या



**माढा– उपस्थिती–** माळशिरस निवडणूक प्रमुख के. के. पाटील, संयोजक माळशिरस तालुका बाळासाहेब सरगर, हनुमंत बापु सुळ, सचिव सोपानं नारनवर, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब वावरे, संघटन सरचिटणीस संजय देशमुख, युवा मोर्चा उपाध्यक्ष युवराज वाघमोडे, अमर मगर, मिनीनाथ मगर आदी.



**सोलापूर– उपस्थिती–** भाजपा उमेदवार राम सातपुते, कोळी महासंघाचे अध्यक्ष आ.रमेश पाटील, कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, देवानंद भोईर, लक्ष्मण शिरसाठ, सतीश धडे, शिवशंकर फुले, चंद्रकांत घोडके, विठ्ठल इरले, विक्रम शिरसाट, कांचना येनम, नरेंद्र काळे आदी.



**अहमदनगर– उपस्थिती–** आ. मोनिकाताई राजळे, भाजपा उमेदवार सुजय विखे–पाटील आदी.



**धाराशिव– उपस्थिती–** पंचायतराज व ग्रामविकास विभाग प्रदेश संयोजक गणेशकाका जगताप, पंचायतराज विभाग महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक प्रसाद कुलकर्णी, निनाद पटवर्धन, जिल्हाध्यक्षा अस्मिता कांबळे, शाहुराजे निंबाळकर, नितीन नागटिळक, विशाल निलाखे आदी.



**नांदेड– उपस्थिती–** कामगार मोर्चा प्रदेशाध्यक्ष विजय हरगुडे, कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मदन डापसे, मंगेश चव्हाण, रमेश धात्रक, पंजाबराव पाटील, श्याम पुसदकर आदी.



**अहमदनगर– उपस्थिती–** जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे, संतोष गांधी, शशांक कुलकर्णी, वसंत राठोड, किशोर कटोरे, अनिल गट्टाणी, अनिल सबलोक, रोहन शेलार, अजय ढोणे, ज्ञानेश्वर काळे, करण दापसे, संतोष शिरसाठ, राहुल रासकर, बल्लू सचदेव, महावीर कंकरिया आदी.




**सोलापूर– उपस्थिती–** युवा मोर्चा शहराध्यक्ष डॉ.किरण देशमुख, श्रीकांत घाडगे, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष संदीप जाधव, शेखर फंड, आनंद कोलारकर, पवन पाटील, सतीश कुदळे, मंडल अध्यक्ष देविदास बनसोडे आदी.



**बुलडाणा– उपस्थिती–** प्रदेश संयोजक–पदवीधर प्रकोष्ठ महाराष्ट्र धनराज विसपुते, जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख, शैलेश बोराडे, श्रीराम बोराडे, जिल्हाध्यक्षा डागा ताई, दिनेश मोरे, योगेश जगताप, भाजपा पदवीधर प्रकोष्ठ मनीष गावंडे, संजय पाटणे आदी.

# अल्पसंख्यांक मोर्चाचा प्रचारातील सहभाग



**वर्धा व हिंगणघाट येथे मुस्लिम बहुल बूथ प्रमुख आणि अल्पसंख्यांक मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद- उपस्थिती-** अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, आ. पंकज भोयर, आ. समिर कुणावार, महामंत्री जुनेद भाई, रीदा रशीद, रमजान अन्सारी आदी.



**सांगली-मिरज येथे मुस्लिम समाजाचा मेळावा- उपस्थिती-** कामगार मंत्री तथा पालक मंत्री सुरेश खाडे, महायुतीचे उमेदवार खा. संजय पाटील, अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, शेखर इनामदार, दिपक शिंदे, काकासाहेब धामणे, प्रकाश ढंग, इम्रान शेख, अल्पसंख्याक प्रदेश सचिव फारुक जमादार, पप्पु आतार, आजमभाई मकानदार आदी.

**सोलापुर- अल्पसंख्याक मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद- उपस्थिती-** अल्पसंख्यांक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी, प्रदेश उपाध्यक्ष रवी जहिर चौधरी, शहराध्यक्ष सगरी, महामंत्री जिशान सय्यद आदी.














**पुणे-सोलापूर-सातारा- उपस्थिती-** पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महायुतीचे उमेदवार छत्रपती उदयनराजे भोसले, मुरलीधर मोहोळ, राम सातपुते, सुनेत्रा पवार, शिवाजीराव आढळराव पाटील, श्रीरंग बारणे आदी.








**बुलडाणा– उपस्थिती–** राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, महायुतीचे उमेदवार प्रतापराव जाधव, आ. संजय कुटे, आ. आकाश फुंडकर आदी.



# राज्यातील प्रचारसभा



**अमरावती– उपस्थिती–** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा, आ. प्रविण पोटे आदी.







**अकोला– उपस्थिती–** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. हरिश पिंपळे, आ. प्रकाश भारसाकळे, खा. भावना गवळी आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













प्रति,

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com